

नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ पाने ८ किंमत ३ रूपये अहिल्यानगर, मंगळवार दि. ०३.११.२०२६ अंक नं. १८२ वर्ष ६९ वे दैनिक वर्ष ६३ वे ANR/022/2018-2020




जिल्हा बँकेत विखे-थोरात-गडाख पॅनलचीच सरशी; पण लंकेंना रोखण्यात अपयश

नगर – बहुचर्चित जिल्हा सहकारी बँकेच्या दहा जागांसाठीच्या निवडणुकीचा निकाल जाहीर झाला असून संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागलेल्या पारनेर सेवा सोसायटी मतदारसंघातून खासदार नीलेश लंके यांनी चुरशीच्या लढतीत एकतर्फी विजय मिळवत बँकेत विजय मिळविला. आ. प्राजक्त तनपुरे यांनी राहुरीचा गड राखला तर, अकोल्यातून निवडून येण्याचे आ. किरण लहामटे यांचे स्वप्न मात्र भंगले. शेती पूरक मतदारसंघातून आ. आशुतोष काळे विजयी झाले. सेवा सोसायटीच्या चार जागांपैकी एक जागा विखे-थोरात-गडाख गटाला, एक जागा लंके-लोखंडे गटाला, एक जागा विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे गटाला, तर एक जागा अपक्षाला मिळाली.

(सविस्तर वृत्त व छायाचित्र पान २ वर)











जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक के. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

जिल्हा बँकेत विखे-थोरात-गडाख पॅनलचीच सरशी; पण खासदार निलेश लंके यांना रोखण्यात अपयश

सहकार पॅनलला १७, राम शिंदे गटाला दोन, परिवर्तन पॅनलला एक, तर अकोल्याची जागा अपक्षाला

नगर - बहुचर्चित जिल्हा सहकारी बँकेच्या दहा जागांसाठीच्या निवडणुकीचा निकाल जाहीर झाला असून संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागलेल्या पारनेर सेवा सोसायटी मतदारसंघातून खासदार नीलेश लंके यांनी चुरशीच्या लढतीत एकतर्फी विजय मिळवत बँकेत विजय मिळविला. आ. प्राजक्त तनपुरे यांनी राहुरीचा गड राखला तर, अकोल्यातून निवडून येण्याचे आ. किरण लहामटे यांचे स्वप्न मात्र भंगले. शेती पूरक मतदारसंघातून आ. आशुतोष काळे विजयी झाले. सेवा सोसायटीच्या चार जागांपैकी एक जागा विखे-थोरात-गडाख गटाला, एक जागा लंके-लोखंडे गटाला, एक जागा विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे गटाला, तर एक जागा अपक्षाला मिळाली.

राखीवच्या सहा जागांपैकी सर्व सहाही जागा मिळवित विखे-थोरात-गडाख गटाने वर्चस्व राखले. तर, सेवा सोसायटी मतदारसंघातील दहा व बिगर शेती पूरक राखीव मतदारसंघातील एक अशा अकरा जागा आधीच बिनविरोध झाल्या होत्या. त्या अकराही जागा विखे-थोरात-गडाख गटाच्या आहेत. त्यामुळे जिल्हा बँकेवर विखे-थोरात-गडाख गटाचेच वर्चस्व राहिले आहे. पॅनलनिहाय विचार करता विखे-थोरात-गडाख गटाच्या सहकार विकास पॅनलला १७, राम शिंदे गटाला दोन, लंके-लोखंडे गटाच्या सहकार परिवर्तन पॅनलला एक, तर अकोल्याची जागा अपक्षाला मिळाली. या निवडणुकीच्या माध्यमातून खा. लंके यांचा थेट, तर सभापती शिंदे यांचा दोन संचालकांच्या माध्यमातून जिल्हा बँकेत व सहकारात प्रवेश झाला आहे.

दहा जागांच्या मतमोजणीची नगर-कल्याण रोडवरील अमरज्योत लॉन येथे सकाळी नऊ वाजता सुरवात झाली. संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागलेल्या पारनेर सेवा सोसायटीचा निकाल सर्वप्रथम लागला व त्यात खासदार लंके यांनी विखे यांचे कट्टर समर्थक व भाजपाचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे यांचा तब्बल २४ मतांनी पराभूत करत चुरशीच्या वाटणाऱ्या या लढाईत एकतर्फीच मैदान मारले. दुसरा निकाल अकोले सेवा सोसायटीचा जाहीर झाला. त्यात जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष सीताराम गायकर यांच्या कन्या संजीवनी शिंदे यांनी थेट आ. किरण लहामटे यांनाच आस्मान दाखवले. शिंदे यांना ४९, तर लहामटे यांना ३६ मते मिळाली. त्यानंतर तिसरा निकाल कर्जत सेवा सोसायटीचा लागला. त्यात राम शिंदे गटाच्या ज्योती शिंदे यांनी बँकेचे माजी संचालक अंबादास पिसाळ यांचे चिरंजीव तुषार पिसाळ यांना पराभूत केले. शिंदे यांना ५४ तर, पिसाळ यांना २० मते मिळाली. चौथा निकाल राहुरी सेवा सोसायटीचा लागला. त्यात आ. प्राजक्त तनपुरे यांनी देवळाली प्रवराचे नगराध्यक्ष सत्यजीत कदम यांना ८९ विरुध्द १८ अशा मोठ्या मताधिक्क्याने हरवले.

त्यानंतर पाचवा निकाल शेती पूरक सेवा सोसायटी मतदारसंघाचा लागला. विखे-थोरात-गडाख गटाचे आ. आशुतोष काळे यांनी लंके-लोखंडे गटाच्या सुधीर म्हस्के यांचा ७५० विरूध्द १२४ अशा मोठ्या फरकाने पराभव केला. त्यानंतर सहावा निकाल अनुसूचित जाती-जमाती मतदारसंघाचा लागला. यात विखे-थोरात-गडाख गटाचे माजी आमदार वैभव पिचड यांनी लंके-लोखंडे गटाच्या प्रशांत लोखंडे यांचा पराभव केला. पिचड यांना २६९० तर, लोखंडे यांना १०८६ मते मिळाली. सातवा निकाल महिला राखीवच्या दोन जागांचा जाहीर झाला. यात विखे-थोरात-गडाख गटाच्या अनुराधा नागवडे व संगिता वाघ या विजयी झाल्या. त्यांनी लंके-लोखंडे गटाच्या हर्षदा काकडे व संध्या महाडुंळे यांचा पराभव केला. आठवा निकाल भटक्या विमुक्त राखीव मतदारसंघाचा लागला. त्यात विखे-थोरात गटाचे गणपतराव सांगळे हे २४६१ मते घेऊन विजयी झाले. त्यांनी लंके-लोखंडे गटाच्या ऋषीकेश ढाकणे (१२८७) यांचा पराभव केला. शेवटचा निकाल इतर मागास प्रवर्ग (ओबीसी) मतदारसंघाचा लागला. त्यात विखे-थोरात गटाचे कारभारी जावळे २६७६ मते घेऊन विजयी झाले. त्यांनी लंके-लोखंडे गटाच्या जालिंदर वाकचौरे (७३३) यांचा पराभव केला. याठिकाणी राम शिंदे गटाचे अजिनाथ हजारे यांना नगण्य मते मिळाली.

दरम्यान, जिल्हा सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या २०२६ ते २०३१ या पंचवार्षिक निवडणुकीतील बिनविरोध न झालेल्या दहा जागांसाठी २ नोव्हेंबर रोजी काही शाब्दीक वाद वगळता शांततेत मतदान पार पडल होते. सोसायटी मतदारसंघातील चार आणि राखीव प्रवर्गातील सहा अशा दहा जागांसाठी झालेल्या मतदानात जिल्ह्यातील ९९.२७ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. ३ हजार ८३७ मतदारांपैकी ३ हजार ८०९ मतदारांनी मतदान केल्याने मतदानाची टक्केवारी विक्रमी पातळीवर पोहोचली होती. जिल्ह्यातील अकोले, नेवासा, पाथर्डी, श्रीगोंदा आणि श्रीरामपूर या पाच तालुक्यांत शंभर टक्के मतदान झाल होते. तर, सर्वाधिक मतदार असलेल्या संगमनेर तालुक्यातील ७१५ मतदारांपैकी ७१४ जणांनी मतदान केल्याने येथे ९९.८६ टक्के मतदानाची नोंद झाली होती. इतर तालुक्यातही सरासरी ९९ टक्क्याच्या घरात मतदान झाले होते.

मतदारसंघनिहाय निकाल

पारनेर सेवा सोसायटी मतदारसंघ
खा. नीलेश लंके - ६४ मते (विजयी) लंके-लोखंडे गट
राहुल शिंदे - ४० मते (पराभूत) विखे-थोरात गट

अकोले सेवा सोसायटी मतदारसंघ
संजीवनी शिंदे - ४९ मते (विजयी) अपक्ष
आ. किरण लहामटे - ३६ मते (पराभूत) अपक्ष

राहुरी सेवा सोसायटी मतदारसंघ
आ. प्राजक्त तनपुरे - ८९ मते (विजयी) विखे-थोरात गट
सत्यजीत कदम - १८ मते (पराभूत) अपक्ष

कर्जत सेवा सोसायटी मतदारसंघ
ज्योती शिंदे - ५४ मते (विजयी) राम शिंदे गट
तुषार पिसाळ - २० मते (पराभूत) अपक्ष

शेती पूरक मतदारसंघ
आ. आशुतोष काळे - ७५० मते (विजयी) विखे-थोरात गट
सुधीर म्हस्के - १२४ मते (पराभूत) लंके-लोखंडे गट

इतर मागास प्रवर्ग (ओबीसी) मतदारसंघ
कारभारी जावळे - २६७६ मते (विजयी) विखे-थोरात गट
जालिंदर वाकचौरे - ७३३ मते (पराभूत) लंके-लोखंडे गट

अनुसूचित जाती-जमाती मतदारसंघ
वैभव पिचड - २६९० मते (विजयी) विखे-थोरात गट
प्रशांत लोखंडे - १०८६ मते (पराभूत) लंके-लोखंडे गट

भटक्या विमुक्त राखीव मतदारसंघ
गणपतराव सांगळे - २४६१ मते (विजयी) विखे-थोरात गट
ऋषीकेश ढाकणे - १२८७ मते (पराभूत) लंके-लोखंडे गट

महिला राखीव मतदारसंघ (दोन जागा)
अनुराधा नागवडे - २६४१ मते व संगिता वाघ - २२९२ मते (विजयी) विखे-थोरात गट, हर्षदा काकडे - १४८९ व संध्या महाडुंळे - ४६४ (पराभूत) लंके-लोखंडे गट

शंभर लांडगे आले एकत्र तरी एका वाघाची शिकार करू शकत नाही: खा. लंके

जनता माझ्या बरोबर आहे. एखाद्या वाघाची शिकार शंभर लांडगे आले तरी करू शकत नाही. खूपतर त्याला त्रास देवू शकतात. पारनेर तालुका हा सेनापती बापटांच्या विचारांचा स्वाभिमानी तालुका आहे. येथील जनता विकावू नाही. स्वाभिमानी आहे. ती दादागिरीला भिक घालत नाही. जंगलात एकच सिंह असतो अन तो सिंह म्हणजे नीलेश लंके. त्याला कुणीही रोखू शकत नाही. हा सर्वसामान्य शेतकऱ्यांचा विजय आहे. ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात विरोधी पॅनलमध्ये असले तरी ते माझे नेते होते आहेत अन कायम राहतील, अशी सूचक प्रतिक्रिया खासदार नीलेश लंके यांनी विजयानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली.

एक खासदार व चार आमदार संचालक, तर एक आमदार पराभूत

आ. मोनिका राजळे, आ. अक्षय कर्डिले हे दोन आमदार बिनविरोध निवडून आले होते, तर आ. प्राजक्त तनपुरे व आ. आशुतोष काळे हे निवडून आले आहेत. दुसरीकडे आ. किरण लहामटे यांना पराभवाचा धक्का बसला. त्यांना जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष सीताराम गायकर यांच्या कन्या संजीवनी शिंदे यांनी आस्मान दाखवले. खासदार नीलेश लंके यांनी पारनेरमधून विजय मिळवत जिल्हा बँकेत दमदार एन्ट्री केली. माजी खासदार डॉ. सुजय विखे हे आधीच बिनविरोध निवडून आले होते. तर माजी खासदार सदाशीव लोखंडे यांचे चिरंजीव प्रशांत लोखंडे यांना पराभव स्विकारावा लागला. माजीमंत्री शंकरराव गडाख हे स्वतः व माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांचे जावाई रणजीत देशमुख हेही बिनविरोध संचालक झाले आहेत. आ. संग्राम जगताप यांचे बंधू सचिन जगताप हेही बिनविरोध निवडून आलेले आहेत. माजी आमदार वैभव पिचड यांनीही बाजी मारली. माजी आमदार कै. जयंत ससाणे यांचे चिरंजीव करण ससाणे हेही बिनविरोध संचालक झाले आहेत, तर आ. आशुतोष काळे यांच्या सासूबाई जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा राजश्री घुले याही बिनविरोध निवडून आल्या होत्या. आ. विवेक कोल्हे यांचे वडील व माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांचे पती बिपीन कोल्हे हेही बिनविरोध निवडून आले आहेत.

बिनविरोध निवडून आलेले अकरा संचालक

यापूर्वी जिल्हा बँकेवर आ. मोनिका राजळे, आ. अक्षय कर्डिले, माजी मंत्री शंकरराव गडाख, माजी खासदार डॉ. सुजय विखे , बिपिन कोल्हे, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष राजश्री घुले, माजी संचालक करण ससाणे, माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचे जावाई रणजीत देशमुख आणि दत्तात्रय पानसरे यासह सचिन घुमरे बिनविरोध निवडून आलेले आहेत. तसेच बिगर शेती मतदारसंघातून सचिन जगताप हे जिल्हा बँकेत अविरोध निवडून आलेले आहेत.

निवृत्त कर्नल लक्ष्मण चितळे यांचे निधन



नगर - भारतीय लष्करातील सेवानिवृत्त कर्नल लक्ष्मण आनंदराव चितळे (वय ९२, रा. नालेगाव, अहिल्यानगर, हल्ली रा. पुणे) यांचे २ नोव्हेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुली, जावई असा परिवार आहे. ते संगीता चितळे, अनिता विचारे यांचे वडील तर आशाताई चितळे यांचे पती व विजय चितळे सर यांचे ते चुलते होत.

मयत निवृत्त कर्नल लक्ष्मण चितळे यांनी १९६२ चे भारत चीन युद्ध, १९६५ चे भारत पाकिस्तान युद्ध, १९७१चे बांगलादेश मुक्तिसंग्राम या सर्व युद्धांमध्ये सहभाग घेतला होता.

मुकुंद भगत यांचे अल्प आजाराने निधन



नगर - एसटी वर्कशॉप समोरील सरोजिनी कॉलनी, रामवाडी येथील रहिवासी मुकुंद मारुती भगत (वय ७४) यांचे ३ नोव्हेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले

त्यांच्या मागे पत्नी, ४ मुली, ४ जावई, नातवंडे असा परिवार आहे. नंदा मुकुंद भगत यांचे पती, राणी सतिश पवार, रेता प्रकाश कोटकर, धनश्री पप्पू पाटील, सोनाली सागर शेडगे यांचे ते वडील होत.

सौ. यमुनाबाई दरवडे यांचे वृद्धापकाळाने निधन



भिंगार - सौ.यमुनाबाई दरवडे (वय ८१) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यामागे पती, दोन मुली, तीन मुलं, सुना, जावई व नातवंडे आदी परिवार आहे.

यमुनाबाई या लक्ष्मीआई भक्त विठ्ठलराव बाबुराव दरवडे यांच्या पत्नी आणि ह. भ.प.अनिता सुडके यांच्या मातोश्री होत. त्या वारकरी संप्रदायाच्या होत्या. गेली अनेक वर्षांपासून त्या भिंगार टेकडीवर हरिपाठ करीत असत.

संत मारुतीबाबा यांच्या त्या निस्सिम भक्त होत्या. वृद्धत्वामुळे त्यांना भिंगार टेकडीवर जाता आले नाही. त्यामुळे त्या माळगल्लीतील श्री संत शिरोमणी सावतामाळी मंदिर येथे पहाटे काकड आरती आणि नित्य हरिपाठास जात असत.

अर्चनाताई कुरी यांचे अल्प आजाराने निधन



नगर - स्वप्नपूर्ती, कल्याण रोड येथील रहिवासी अर्चनाताई संजय कुरी (वय ४५) यांचे २ नोव्हेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पती, २ मुले असा परिवार आहे. संजय कुरी यांच्या त्या पत्नी होत.

साहेबराव बोरुडे यांचे दु:खद निधन



श्रीगोंदा - मांडवगण येथील रहिवासी तुकाराम सखाराम बोरुडे (वय ८५) यांचे २ नोव्हेंबर रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मांडवगण स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. एस.टी. असोसिएटचे साहेबराव बोरुडे व संतोष बोरुडे यांचे ते वडील होत.

डॉ. गोविंदराव घोरपडे यांचे निधन



नगर - घोडेगाव (ता. नेवासा) येथील जुन्या पिढीतील डॉ. गोविंदराव घोरपडे (वय ७८) यांचे अल्पशा आजाराने रविवारी पहाटे निधन झाले. त्यांच्या पाठीमागे पत्नी, मुलगा, सून व नातवंडे असा परिवार आहे. वैद्यकीय शिक्षणाची एमबीबीएस उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांनी १९७८ मध्ये शहरी भागाऐवजी घोडेगाव सारख्या ग्रामीण भागात वैद्यकीय सेवा देण्यास सुरुवात केली. शिराळ चिचोंडी (ता. पाथर्डी) या गावातील ते पहिले एमबीबीएस डॉक्टर होते. परिसरातील सर्व खेडेगावांमध्ये ते डॉक्टर काका म्हणून परिचित होते. डॉ. हर्षल घोरपडे यांचे वडील व डॉ. गौरी घोरपडे यांचे ते सासरे होत.



अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेतील निवडणुकीतील विजयानंतर जल्लोष करताना खासदार नीलेश लंके व त्यांचे समर्थक (छायाचित्र : लहू दळवी)

अहिल्यानगर महापालिकेच्या प्रारूप आरक्षण विकास आराखड्याला छत्रपती संभाजीनगर खंडपीठाकडून मिळाली स्थगिती : किरण काळे



नगर - शहराच्या सुधारित प्रारूप आरक्षण विकास आराखडा प्रक्रियेला मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने अंतरिम स्थगिती दिली आहे. ठाकरे शिवसेनेचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी नगरसेवकांनी बंद दाराआड महासभा घेत कायदा धाब्यावर बसवून हस्तक्षेप करत मोठ्या प्रमाणावर प्रारूप आराखड्यामध्ये बेकायदेशीर हस्तक्षेप केल्याचा आक्षेप याचिकेत घेतला होता. त्यावर ३ नोव्हेंबर खंडपीठात सुनावणी झाली. ॲड. अभिजीत दरंदले यांनी काळे यांच्या वतीने बाजू मांडली. त्यानंतर खंडपीठाने स्थगिती दिल्याचा आदेश दिल्याची माहिती किरण काळे यांनी दिली आहे.

एमआरटीपी कायद्यातील तरतुदींचे मोठ्या प्रमाणावर उल्लंघन करण्यात आल्याचा आक्षेप काळे यांनी याचिकेत घेतला आहे. याबाबत काळे म्हणाले की, आत्ता अंतरिम स्थगिती मिळाली आहे. संपूर्ण आराखडाच रद्द करण्यात यावा अशी माझी न्यायालयाला विनंती आहे. कारण की, ३० जुलै २०२६ रोजी महानगरपालिकेची महासभा झाली होती. आराखड्यातील ६३ आरक्षणे वगळण्यात आली होती. सुमारे ५२ नवी आरक्षणे टाकण्यात आली होती. त्यामध्ये महासभेला अधिकार नसताना देखील बेकायदेशीररित्या ठराव करण्यात आला होता. महासभेने ज्या विषयावर चर्चा केली त्याचे प्रोसिडिंग आणि प्रत्यक्षात केलेला ठराव यामध्ये प्रचंड तफावत आहे.

काळे पुढे म्हणाले, तज्ञ तांत्रिक टीमने सुमारे दोन वर्षे कामकाज करून केलेला प्रारूप आराखडा नगरसेवकांनी बेकायदेशीर हस्तक्षेत करत मोठ्या प्रमाणावर बदलला होता. विकास आराखडा हा पुढील वीस वर्षांसाठी असणार आहे. शहराचे भवितव्य यावर ठरणार आहे. त्यामुळे यामध्ये कुणाचाही बेकायदेशीर हस्तक्षेप असू नये. तसेच कोणाचाही बेकादेशीर हस्तक्षेप शहर विकासाला बाधा ठरू नये. याकरिता अहिल्यानगरकरांच्या वतीने ही याचिका मी दाखल केली आहे.

काळे यांनी उच्च न्यायालयातील या याचिकेत महाराष्ट्र शासनाचा नगरविकास विभाग, पुण्याचे नगर रचना संचालनालय, नाशिक विभागाचे सहसंचालक अधिकारी, अहिल्यानगर महापालिका, आराखडा तयार करणारे नगर रचना अधिकारी अशा सर्वांना प्रतिवादी करण्यात केले आहे. यावर आता खंडपीठामध्ये पुढील सुनावणीचे कामकाज चालेल अशी माहिती काळे यांनी दिली आहे.

सेवेत असताना आरोपीला मदत करणाऱ्या निवृत्त पोलीस हवालदारावर गुन्हा दाखल

नगर - शासकीय सेवेत असताना आणि निवृत्तीनंतरही गुन्ह्याचे मूळ दोषारोपपत्र व महत्त्वाचे कागदपत्र न्यायालयात जमा न करता स्वतःजवळ ठेवून ते नष्ट करून आरोपींना शिक्षेपासून वाचवण्यास मदत केल्याप्रकरणी एका निवृत्त पोलीस हवालदारावर तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे पोलीस दलात खळबळ उडाली आहे.

याबाबत तोफखाना पोलीस ठाण्याचे पो.नि.बालाजी वैद्य यांनी फिर्याद दिली आहे. तत्कालीन तोफखाना पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले निवृत्त पोलीस हवालदार दगडू बाबाजी शेरकर (रा. तराळवाडी, ता. पारनेर) हे २४ नोव्हेंबर २०१७ पासून २ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत सेवेत असताना आणि निवृत्तीनंतरही कर्तव्यात गंभीर कसूर करत असल्याचे निष्पन्न झाले. तोफखाना पोलीस ठाण्यातील एका गुन्ह्याचे (गु.र. क्र. ४८१/२०१३, भा.दं.वि. कलम ३८५, ३४ प्रमाणे) मूळ दोषारोपपत्र आणि संबंधित कागदपत्रे न्यायालयात सादर करून कोर्ट केस नंबर घेणे व फिर्यादीस न्याय मिळवून देणे हे त्यांचे कायदेशीर कर्तव्य होते. मात्र, निवृत्त पो.हे.कॉ. दगडू शेरकर यांनी गुन्ह्यातील मूळ दोषारोपपत्र व कागदपत्रे आरोपींविरुद्ध न्यायालयात पुरावा म्हणून वापरली जाऊ नयेत, आरोपींना फायदा व्हावा आणि त्यांना शिक्षेपासून वाचवता यावे, या उद्देशाने ती कागदपत्रे स्वतःजवळ ठेवून दडपली व नष्ट केली.

आपल्या शासकीय कर्तव्यात गंभीर कसूर करून आरोपींशी संगनमत केल्याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य यांच्या फिर्यादीवरून निवृत्त पोलीस हवालदार दगडू शेरकर यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १९९, २४१ आणि २५५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार शिंदे करत आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

|| प्रथम वर्षश्राद्ध ||



ज्योत अनंतात विलीन झाली.
स्मृती आठणींना दाटून आली.
भाव सुमनांचे ओंजळ भरूनी
वाहतो आम्ही श्रद्धांजली...

कै. आर्यन उर्फ सोहम नितीन जंबूरे
स्वर्गवास दि. १६/१०/२०२५

प्रथम वर्षश्राद्ध
अश्विन कृष्ण दशमी बुधवार
दि. ४/११/२०२६ रोजी सकाळी ११ वाजता
स्थळ : विठ्ठल मंदिर, डावरे गल्ली, अहिल्यानगर

* दु:खांकित *
ॲड. नितीन विश्वनाथ जंबूरे
श्री. अजय सुभाष जंबूरे श्री. वैभव अरुण जंबूरे
श्री. वरद दिग्विजय जंबूरे साक्षी नितीन जंबूरे



गृहिणी

आरोग्य

ऋतुमानातील बदल आणि आरोग्य

हवामानातील बदलांमुळे मानवी शरीरावर त्याचा थेट परिणाम होतो. ऋतू बदलताना किंवा वातावरणात अचानक होणाऱ्या चढ-उतारामुळे मानवी शरीराची रोगप्रतिकारशक्ती काही काळासाठी मंदावते, ज्यामुळे निरनिराळ्या आजारांचा प्रसार वेगाने होतो. विशेषतः पावसाळ्यात आणि हिवाळ्याच्या सुरुवातीला हवेतील ओलसरपणा, थंड हवा आणि सूक्ष्मजीवांची वाढ यांमुळे सर्दी, खोकला, ताप, घशाचे संसर्ग आणि डोकेदुखी यांसारखे त्रास घरोघरी दिसून येतात. दूषित पाणी आणि दूषित अन्नपदार्थ यांमुळे पोटाचे विकार, जुलाब आणि उलट्या यांसारख्या समस्या उद्भवतात. याशिवाय डासांची पैदास वाढल्यामुळे कीटकजन्य आजारांचा प्रसार होऊन शरीर अत्यंत अशक्त बनते. लहान मुले, वृद्ध व्यक्ती आणि आधीपासूनच आजारी असलेल्या लोकांसाठी हे हवामानातील बदल अधिक त्रासाचे ठरू शकतात. या सर्व बदलांपासून स्वतःचे आणि कुटुंबाचे रक्षण करण्यासाठी काही मूलभूत सवयींचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे. सर्वप्रथम आपल्या आहारात ताजे, गरम आणि सुपाच्य अन्नपदार्थांचा समावेश करावा. शिळे किंवा उघड्यावरील अन्नपदार्थ खाणे पूर्णपणे टाळावे. पिण्याचे पाणी नेहमी उकळून आणि गाळून प्यावे, ज्यामुळे पोटाचे आजार आणि इतर संसर्गजन्य रोगांपासून संरक्षण होते. ऋतूनुसार योग्य ती वस्त्रे परिधान करावीत; थंडीच्या दिवसांत उबदार कपडे आणि पावसाळ्यात ओले कपडे अंगावर न ठेवता शरीर कोरडे राहील याची दक्षता घ्यावी. डासांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी घराभोवती साचलेले पाणी उपसून परिसर स्वच्छ ठेवावा आणि झोपताना योग्य ती काळजी घ्यावी. यासोबतच रोजच्या आहारात हळद, आले, तुळस आणि ताजी फळे यांसारख्या रोगप्रतिकारशक्ती वाढवणाऱ्या नैसर्गिक पदार्थांचा वापर करावा. रोजच्या जीवनशैलीत पुरेशी झोप आणि योगासनांचा समावेश केल्यास शरीर मजबूत बनते आणि वातावरणातील कोणत्याही बदलांना सहज तोंड देऊ शकते.

पाककला

हनी चिली पोटॅटो

साहित्य : बटाटा ३ मध्यम, कॉर्नफ्लोअर ४ चमचे, मैदा २ चमचे, काळी मिरी पावडर १/४ चमचा, मीठ चवीनुसार, तेल तळण्यासाठी, बारीक चिरलेला लसूण १ चमचा, बारीक चिरलेला आले १/२ चमचा, बारीक चिरलेली हिरवी मिरची १, बारीक चिरलेला कांदा १ लहान, चौकोनी चिरलेली शिमला मिरची १/२, तीळ १ चमचा, सोया सॉस १ चमचा, रेड चिली सॉस २ चमचे, टोमॅटो केचप १ चमचा, व्हिनेगर १ चमचा, मध २ चमचे, पाणी १/४ वाटी, बारीक चिरलेली कोथिंबीर १ चमचा

कृती : बटाटा सोलून त्याच्या लांबट फ्रेंच फ्राईज सारख्या काड्या करून घ्या. पाण्याने २ ते ३ वेळा धुवून घ्या. त्यात कॉर्नफ्लोअर, मैदा, काळी मिरी पावडर आणि मीठ घालून चांगले मिक्स करा. कढईत तेल गरम करून मध्यम आचेवर बटाट्याच्या काड्या खरपूस आणि कुरकुरीत होईपर्यंत तळून घ्या. एका कढईत १ चमचा तेल गरम करून त्यात लसूण, आले, हिरवी मिरची परतून घ्या. त्यात कांदा, शिमला मिरची घालून एक मिनिट परता. त्यात सोया सॉस, चिली सॉस, केचप, व्हिनेगर आणि थोडे पाणी घालून मिक्स करा. त्यात मध आणि तीळ घाला. सॉस थोडा घट्ट झाला की त्यात तळलेल्या बटाट्याच्या काड्या घालून हलक्या हाताने मिक्स करा. वरून कोथिंबीर घालून गरम सर्व्ह करा.

वास्तू

पायऱ्यांची संख्या

* घरातील पायऱ्या नेहमी घड्याळाच्या दिशेने (उजवीकडे वळणाऱ्या) असाव्यात.
* पायऱ्यांच्या खाली कधीही जुने सामान, चपला किंवा कचराकुंडी ठेवू नये.
* पायऱ्यांची संख्या नेहमी विषम असावी. (उदा. ११, १५, २१ इत्यादी).

सौंदर्य

चेहऱ्याची मालिश करताना नेहमी मानेपासून खालच्या दिशेने सुरुवात करा शरीरातील अशुद्ध जलभिसरण सुधारते.

सल्ला

खीर करताना दूध पूर्ण उकळल्यानंतर गॅस बंद केल्यानंतरच गूळ घालावा, दूध फाटत नाही. **संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

दैनिक पंचांग

बुधवार, दि. ४ नोव्हेंबर २०२६

---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, आश्विन कृष्णपक्ष, पूर्वा २७।३०, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०६ वा. २८ मि.

राशिभविष्य

मेष : आजचा दिवस उत्साहाने भरलेला राहील.

वृषभ : आर्थिक लाभाचे योग असून, कुटुंबातील सदस्यांचे पूर्ण सहकार्य लाभेल.

मिथुन : बौद्धिक कामांमध्ये यश मिळेल, जुन्या मित्रांची भेट आनंद देईल.

कर्क : आरोग्याची काळजी घ्या, कामाच्या ठिकाणी घाईघाईत निर्णय घेणे टाळा.

सिंह : मान-सन्मानात वाढ होईल, रखडलेली कामे मार्गी लागतील.

कन्या : कामाच्या ठिकाणी मेहनत वाढवावी लागेल, खर्चावर नियंत्रण ठेवाल.

तुला : भागीदारीच्या व्यवसायात फायदा होईल, वैवाहिक जीवनात गोडवा राहील.

वृश्चिक : आत्मविश्वासात वाढ होईल, प्रवासाचे योग संभवतात.

धनु : धार्मिक कार्यांमध्ये रुची वाढेल, विद्यार्थ्यांना शिक्षणात यश मिळेल.

मकर : वरिष्ठांचे सहकार्य लाभेल, नोकरीत पदोन्नतीची शक्यता आहे.

कुंभ : नवीन ओळखी फायदेशीर ठरतील, मनातील इच्छा पूर्ण होईल.

मीन : आर्थिक बाजू मजबूत राहील, व्यवसायात चांगली वाढ होईल.

शब्दगंध क्र. ७५५० सौ.शैलजा कुलकर्णी



आडवे शब्द :- १) सिल्व्हर ज्युबिली; रौप्य महोत्सव ६) पिकांवर पडणारा एक रोग; खवा ७) यशस्वी; विजयी ८) पातळ पदार्थ १०) फायदा; लाभ १२) 'नारायण! नारायण!' असा उद्घोष करीत तिन्ही लोकी फिरणारे देवर्षी १३) उपहास; फजिती; हुर्यो १५) समूह; कळप (पक्ष्यांचा) १६) एकसारखे बोलणे; बडबड; वटवट १८) एक शिरोभूषण; मंजिरी १९) झाकण असलेले भांडे २१) गायीचे दूध २३) अळ्या वगैरेंची एकाच जागी होणारी एकसारखी हालचाल २४) दाटी; गर्दी; नाश

शब्दगंध क्र. ७५४९ चे उत्तर

ज	मा	ल	गो	टा	■	पा	गा
हा	र	क	■	च	त	को	र
ज	■	वा	चा	■	मा	ळ	■
■	शी	■	क	या	स	■	प
भ	र	धा	व	■	गी	वा	ण
गी	■	म	त	दा	र	■	वा
र	वा	■	■	वा	■	को	न
थ	र	का	प	■	फा	ट	क

उभे शब्द :- १) 'जन गण मन' हे राष्ट्रगीत लिहिणारे बंगाली कवी २) फिकीर; पर्वा ३) युवा; युवा; तरुण; भारतीय सैनिक ४) एक समसंख्या; एका महिन्यातील सरासरी दिवस ५) वर्षाच्या बोलीने ठेवलेला नोकर ९) रतीब; उकाडा ११) कुंपणाचा मोठा दरवाजा १४) अरबी देव १६) ठीक; भला १७) थोडेसे कडू; पक्का १८) हेकट; हट्टी २०) लहान मूल; बालक २२) पांघरण्याचे एक जाड व उबदार वस्त्र; मस्ती; जोर २३) कापड; कपडा; वसन

* * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

सुविचार : पैशाने खरेदी करता न येणाऱ्या गोष्टींपैकी सर्वात मूल्यवान गोष्ट म्हणजे 'समाधान' आणि 'माणुसकी'.

मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

दुधाला उकळी आल्यावर ते पातेल्याबाहेर सांडते, पण पाणी उकळल्यावर सांडत नाही, असे का?

दुधाला उकळी आल्यावर ते पातेल्याबाहेर सांडते आणि पाणी उकळल्यावर मात्र सांडत नाही, यामागचे मूळ कारण दोन्ही द्रव्यांच्या रासायनिक रचनेत आणि त्यांच्या भौतिक गुणधर्मांमध्ये दडलेले आहे.

जेव्हा आपण साधे पाणी गरम करतो, तेव्हा पाण्यातील रेणू तापमानामुळे हलके होतात आणि वाफेमध्ये रूपांतरित होऊ लागतात. पाण्याची वाफ बुडबुड्यांच्या स्वरूपात तळापासून वर येते आणि पाण्याच्या पृष्ठभागावर पोहोचताच हवेत विरून जाते. पाण्यात कोणतेही स्निग्ध पदार्थ, प्रथिने किंवा घट्ट घटक नसतात. त्यामुळे पाण्याच्या पृष्ठभागावर उकळताना कसलाही अडथळा निर्माण होत नाही. पाण्याची वाफ अगदी मोकळेपणाने आणि सहजपणे हवेत उडून जाते, ज्यामुळे पाण्याचा पृष्ठभाग शांत राहतो आणि पाणी कितीही वेळ उकळले तरी ते कधीही पातेल्याबाहेर सांडत नाही. याउलट, दुधाची रचना पूर्णपणे वेगळी असते. दूध हे केवळ पाणी नसून ते एक प्रकारचे मिश्रण आहे ज्यामध्ये पाहत्रग्ण, स्निग्ध पदार्थ, विविध प्रथिने, शर्करा आणि खनिजे यांचे सूक्ष्म कण विरघळलेले असतात. जेव्हा आपण दूध गरम करायला सुरुवात करतो, तेव्हा पाण्याचे वाफेमध्ये रूपांतर होण्याचे प्रमाण वेगाने वाढते. पण त्याच वेळी, दुधातील प्रथिने आणि स्निग्ध पदार्थ तापमानामुळे एकत्र येतात आणि दुधाच्या पृष्ठभागावर एक बारीक, लवचिक आणि घट्ट आवरण किंवा साय तयार करतात.

ही साय दुधाच्या पृष्ठभागावर एका पडद्यासारखी काम करते. तळाशी तयार होणारी वाफ जेव्हा वर येऊ लागते, तेव्हा तिला या घट्ट सायाच्या थरामुळे सहजपणे बाहेर पडता येत नाही. वाफ त्या थराखाली अडकून राहते आणि सतत दाब वाढवत जाते. जसजशी उष्णता वाढते, तसतशी वाफ अधिक प्रमाणात तयार होते आणि अडकलेली वाफ त्या सयेला फुग्यासारखी वरच्या बाजूला ढकलते. सयेचा हा थर रबरासारखा ताणला जातो आणि वाफेला कोंडून ठेवतो.

जेव्हा हा दाब खूप जास्त वाढतो, तेव्हा सयेचा तो लवचिक पडडा एकदम वर येतो आणि दुधाचे बुडबुडे संपूर्ण पातेल्यात वेगाने पसरतात. दाब सहन न झाल्यामुळे दूध त्या घट्ट थरासह एकदम उसळून पातेल्याच्या कडा ओलांडून बाहेर सांडते. म्हणूनच, पाण्याच्या तुलनेत दुधामध्ये स्निग्ध पदार्थ आणि प्रथिनांचा घट्ट थर असल्यामुळे ते उकळताना सहजपणे बाहेर सांडते.

नको ती घाई

एका गावात माधव नावाचा एक अत्यंत कुशल आणि जुना कारागीर राहत होता. तो हाताने अतिशय सुंदर आणि टिकाऊ पारंपरिक वस्तू तयार करायचा. त्याची कला एवढी अप्रतिम असायची की, लांबून लांबून लोक त्याच्याकडून वस्तू खरेदी करायला यायचे.

माधवच्या हाताखाली रोहन नावाचा एक तरुण मुलगा काम शिकत होता. रोहन हुशार होता, पण त्याच्यामध्ये एका गोष्टीची खूप कमतरता होती-संयम. त्याला नेहमी वाटायचे की माधव उगीचच एका एका वस्तूवर दिवस-दिवस घालवतो. रोहनला पटकन भरपूर माल तयार करायचा होता आणि लवकरात लवकर खूप पैसे कमवायचे होते.

एके दिवशी गावात एक मोठा व्यापारी आला. त्याने दोन दिवसांत ५० उत्कृष्ट वस्तू तयार करून देण्याची ऑर्डर दिली आणि सांगितले, जो मला वेळेत आणि चांगल्या दर्जाचा माल देईल, त्याला मी मोठी रक्कम आणि पुढचे मोठे कंत्राट देईन. माधव शांतपणे म्हणाला, दोन दिवसांत ५० चांगल्या वस्तू बनवणे शक्य नाही. एका चांगल्या वस्तूसाठी वेळ, बारकावे आणि लक्ष द्यावे लागते. पण रोहनने ही संधी हातातून जाऊ दिली नाही. तो व्यापाराला म्हणाला, मी दोन दिवसांत ५० वस्तू तयार करून देईन!

रोहनने लगेच काम सुरू केले. त्याने गुणवत्तेपेक्षा वेगावर भर दिला. वस्तू जोडताना व्यवस्थित वाळू दिले नाही, कलाकुसर करताना बारीक-सारीक चुकांकडे दुर्लक्ष केले आणि कशातरी ५० वस्तू दोन दिवसांत बनवून पूर्ण केल्या. त्याला वाटले, मी माधवकडूनही पुढे गेलो!

दुसऱ्या दिवशी व्यापाराने रोहनचा माल घेतला, त्याला पैसे दिले आणि तो निघून गेला. रोहनचा आनंद गगनात मावेनासा झाला. तो माधवकडे बघून मनातल्या मनात हसला. पण हा आनंद फार काळ टिकला नाही. अवघ्या आठवड्याभरात तो व्यापारी परत आला. त्याच्यासोबत काही संतप्त ग्राहकही होते. रोहनने घाईघाईत बनवलेल्या वस्तू वापरतानाच तुटल्या होत्या, काहींची कलाकुसर उडाली होती. व्यापाराने रोहनला खडे बोल सुनावले, उरलेला माल परत केला आणि आपले पैसे मागे घेतले. रोहनचे नाव तर खराब झालेच, पण त्याचे मोठे आर्थिक नुकसानही झाले.

रोहन खाली मान घालून बसला होता. तेव्हा माधव त्याच्याजवळ आला आणि प्रेमाने म्हणाला, बाळा, झाडाला फळ यायलाही वेळ लागतो. जर आपण ते फळ वेळेआधीच घाईने तोडले, तर ते आंबटच निघणार. कोणतेही काम करताना दर्जा महत्त्वाचा असतो, वेग नाही. घाईघाईने घेतलेला शॉर्टकट आपल्याला काही काळासाठी पुढे नेईल, पण शेवटी नुकसानच करतो. रोहनला आपली चूक कळून आली होती. त्याने माधवकडे क्षमा मागितली.

बोध : यशाचा कोणताही शॉर्टकट नसतो, संयम आणि सातत्य हीच यशाची गुरुकिल्ली आहे.

आत्मशक्ति



अध्यात्मिक शक्ती

आम्ही जो जो मला शांत करीत जाण्याचा प्रयत्न करीत जातो तो तो त्यात अधिकाधिक विचार येत जातात. मन वाऱ्यासारखे असते. ते सतत अस्वस्थ आणि चंचल असते. ते कधीमधे स्थीरबुद्ध वासना, परिश्रम, द्वेष आणि द्वेषातून फुल ट्युलिपच्या जाळे शकते. सतत व भटक्या मनाच्या ह्या समस्येचा उपाय नामस्मरण आहे. परमेश्वर नामाचा सतत जप केल्यास मनाला अडकवून ठेवावे व त्यास त्रास ठेवावा असे बहुतेक धर्मग्रंथांत म्हटले आहे. गुरुमंत्राचा सातत्याने जप केल्याने मन वश राहते, त्यामुळे ध्यानाभ्यासात वेध आम्ही आपले ध्यान सिमरणच्या टूथवर केंद्रीत कर शकतो.काही लोक मुखाने (शब्द उच्चारून) जप करतात आणि काही लोकांचे मत आहे की मौन, फिरून राहून जप करावा.

काही लोक स्थिर (शांत व सुखात बस करतात. परंतु सर्वांत उत्तम पद्धत म्हणजे परमेश्वराच्या नामाचा जप मनातल्या मनात करणे। असा जप केल्याने लक्ष्य हे आहे की त्याचे शरीर स्थिर राहते. जर (नामजपात) जीभ वाचू ठेवली तर लक्ष जीभेकडे जाते. तोंडाने जप केल्याने आवाज तोंडाकडे खेचले जाईल, मनातल्या मनात जप केल्याने ईश्वराचा जप केला जात नाही तोवर बंध राहते आणि कोण शांत (स्वस्थ) असतात.

मनातल्या मनात जप केल्याने फार आवाज म नाचा वापर होतो आणि हाच तर जगाचा हेतू असतो. त्यामुळे मन त्यात अडकून राहते. मात्र हे नाम गुप्तपणे फिरताना पाहिजे अशा परमेश्वराच्या नामाबरोबर मन शांत होते.

जेव्हा मन शांत होते तेव्हा कोणत्याही अडथळा न होता आमचे ध्यान शिवनेत्रावर केंद्रीत होते आणि आम्हाला परमेश्वराच्या ज्योति आणि श्रुतीचे दर्शन होते.ज्या शब्दांचा जप केला जातो त्यांना बहुधा 'मंत्र' म्हटले जाते. प्राचीन काळापासून मंत्रांचा उच्चार केला जात आहे. ही मोठी निवड आध्यात्मिक विद्येच्या

(क्रमशः)

(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)

चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

नाती घट्ट विणू या

आपण हे सगळं खऱ्या भावनेने करायला हवे.दुसरा अंधेर : कधीतरी, तुम्ही आमच्या घरी कधीतरी थेट कधी येऊन गेल्या किंवा आम्ही तिथे वाटाघाटीचा कार्यक्रम आयोजित केला होता, अशा गप्पा किंवा आम्ही तिथे येण्यासाठी कार्यक्रम आयोजित केला होता, अशा बदला लोक मारतात.

शिवानीदी : अशा घटनेत, पूजापाठाशी संबंधित व्यवसायाबाबत एखाद्या व्यक्तीला छान वाटतं पण तो फक्त 'फील गुड फॅक्टर' असेल. त्यामुळे आत्म्याचे ते सवलतीकरण होणार हात लावणे अनेकदा मी काही शंका नाही.आपण आपल्या कुटुंबासाठी सर्वांसाठी आपल्या मलिकापासून लांब जात असतील... आज काय, दिवाळीचा आहे.. असं लोक म्हणतात. प्रत्येक जण स्वतःच्या क्षमतेवरकडे जाऊन गोष्टींचं बाह्य स्वरूप परिपूर्ण करण्याचा प्रयत्न करत आहे. त्या कृतीमागचा हेतू कोणीच तपासत नाही. लोकांकडून प्रथमा कधी किंवा लोक काय म्हणतील या भीतीपोटी आपण काही करत असू तर तिथे काही अडकलेलं नाही. परिणामी आपण आपल्या मौलिकत्वाचा विचार करून राहत नाही.

आज या संस्कारावर काम करू या. प्रेम ाच्या होण्याला हा मोठा अडथळा आहे आणि बदलण्यासाठी तसा सोपा आहे. आपल्या आयुष्यात छोट्या मोठ्यापासून ते मोठ्या निर्णयापर्यंत आपण जे काही करू, ते आपल्याला आणि आपल्या कुटुंबाला योग्य वाटतं म्हणून केलं पाहिजे... एका महिन्याची प्रयोग म्हणून आपण याची सुरुवात करू शकतो. मग त्यावर जीवन खूप साधं आणि सुंदर होईल.

तुमचंच क्षमतेनुसार काम कराचिंतन प्रेम ाकडे घेऊन जाणारे मंत्रइतरांच्या स्वीकृतीसाठी जर आपले निर्णय अवलंबून असतील तर आपण आपल्यामध्ये उत्पन्न निर्मित प्रेमाचीही शक्यता आहे. एकाच परिस्थितीत, वेगवेगळे असते, त्यांच्यावर झालेल्या पूर्वग्रहांमुळे, वर्तणूकीतील संस्कारांमुळे वेगवेगळे मत मांडतात. आपण निवडलेल्या प्रत्येक गोष्टीसाठी मांडलेली स्वीकृती मिळणं अशक्य आहे. गरज असेल तर निर्णय घेण्याआधी कुटुंबाकडून आणि मित्रपरिवाराकडून सल्ला घ्या. लोकांना खुश करण्याची किंवा त्यांच्याकडून कौतुक होण्यासाठी निर्णय घेऊ नका.जेव्हा आपण शांत आणि स्थिर असतो तेव्हाच आपल्याला मूळ गुण प्रकाशित होतात. जेव्हा आपल्यावर इतरांचा पगडा परिणाम होतो तेव्हा आपण अस्वस्थ राहतो. परिणामी आपल्या प्रेमाच्या ऊर्जेत अडथळा येतो.

(क्रमशः)

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

हसा आणि शतायुषी व्हा!

गंपू : वेटर, या भाजीमध्ये माशी पडली आहे!

वेटर : सर, जरा हळू बोला... नाहीतर बाकीचे ग्राहक पण भाजीमध्ये माशी मागायला लागतील! गंपू : (चक्रावला!)

करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* भारताची पहिली अंतराळ संशोधन संस्था कोणती आहे?

- इस्रो

- अरविंद ब्राम्हणे, भिंगार मो. ९४०३७३४२८१

आयुर्वेदिक गर्भसंस्कार

आयुर्वेदिक गर्भसंस्कार

कुटुंबाचा इतिहास, सांगितल्याप्रमाणे गर्भधारणेकडे, गर्भावस्थेत आधीपासून ती आधी उद्भवू नये म्हणून डॉक्टरांच्या गर्भधारणाविषयी सगळी माहिती. गर्भधारणा आपल्याला नको आहे उद्भवू नये म्हणून नियोजित केलेल्या वहाण पाहिजे, परंतु तरीही असे शक्य न झाल्यास व पाळी चुकली आहे असे लक्षात आल्यास पाळीच्या तारखेपासून बुडाल्यानंतर १० दिवसात डॉक्टरकडे जावे. त्यावेळी काळजी शारीरिक, मानसिक व कौटुंबिक पार्श्वभूमी तपासून करतात. त्यावर करतात वेळे, त्यांचे महत्त्व आधुनिक काळात दुय्यम उपयोजन करतात. तसेच, पाळीच्या तारखेपासून काळाच्या वेळा मुलाच्या होईल, काळा निघणारी मातेचे पुढील वाक्य हेच ध्येय असते.

डॉक्टरांना दाखवायची माहिती - नाव, पत्ता, वय, धर्म, लस किती दिवसांपूर्वी झालेले आहे, पतीचा व्यवसाय/नोकरी. पाळीचा तक्रारी (नियमित - अनियमित) म्हणजे डॉक्टर तुम्हाला प्रसूतीची तारीख शेवटच्या पाळीची तारीख डॉक्टरांना सांगणे, म्हणजे डॉक्टर तुम्हाला प्रसूतीची तारीख काढून देतील. साधारणत: ही तारीख शेवटच्या पाळीच्या पहिल्या दिवसापासून ९ महिने ७ दिवस असते. आपल्याला होणाऱ्या त्रासाबद्दल माहिती द्यावी. पहिल्या प्रसूतीबद्दल तसेच गर्भपात झाला असेल, तर त्याबद्दलची माहिती डॉक्टरांना द्यावी. पूर्वीचा आजार किंवा शस्त्रक्रिया झाली असेल, तर त्याची माहिती द्यावी.एखाद्या औषधाची प्रतिक्रिया असेल तर त्याची कल्पना डॉक्टरांना द्यावी.आनुवंशिक आजार असतील तर ते सांगावे.

(क्रमशः)

डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

‘नमोह क्लब’च्यावतीने २१ व २२ नोव्हेंबरला अहिल्यानगरमध्ये फुटबॉल स्पर्धेचे आयोजन

सुपर लीगसाठी २० लाखांपर्यंत बोली, पाचव्या सिझनचा थरार; १०५ खेळाडूंचा सहभाग, आठ संघांमध्ये रंगणार चुरस



नगर – अहिल्यानगर फुटबॉल सुपर लीग (ए.एफ.एस.एल.) २०२६ च्या पाचव्या सिझनसाठी खेळाडूंचा लिलाव पार पडला. या लिलावात शहरातील गुणवंत फुटबॉलपटूंवर संघमालकांनी लाखो रुपयांची बोली लावली. विशेष म्हणजे, काही खेळाडूंसाठी तब्बल २० लाख रुपयांपर्यंत बोली लागल्याने यंदाच्या स्पर्धेची उत्सुकता अधिकच वाढली आहे. नमोह फुटबॉल क्लबच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. क्लबच्या ओनर नमिता फिरोदिया यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी या स्पर्धेचे आयोजन केले जाते. स्थानिक खेळाडूंना व्यावसायिक पद्धतीने खेळण्याची संधी मिळावी, त्यांच्यातील कौशल्याला प्रोत्साहन मिळावे आणि शहरात फुटबॉल संस्कृती अधिक बळकट व्हावी, हा या स्पर्धेमागील मुख्य उद्देश आहे.

शहरात झालेल्या खेळाडू निवड व लिलाव प्रक्रियेत आठ संघांच्या मालकांनी सहभाग घेत आपल्या पसंतीच्या खेळाडूंना संघात स्थान देण्यासाठी चढाओढ केली. या लिलावाचे सूत्रसंचालन सनीत मुथा यांनी केले. विद्यादान सायन्स अॅकॅडमी, गुलमोहर स्पोर्ट्स क्लब, नवा मराठा न्यूज, डीइसी बेअरिंग, एमडी अँड आरडीएक्स, प्रॉस्प ऑरा आणि डॉक्टर बायो यांच्या वतीने खेळाडूंसाठी बोली लावण्यात आली.

यंदाच्या स्पर्धेत एमडी अँड आरडीएक्स इन्फ्रा, गुलमोहर चॅलेंजर्स, गांधी वॉरियर्स, डायनामिक स्ट्रायकर, एक्सलन्स अचिव्हर्स, विद्यादान अल्फा एक्स, डॉक्टर बायो आणि नवा मराठा योद्धा असे आठ संघ मैदानात उतरणार आहेत. या संघांमध्ये शहरातील १०५ खेळाडूंचा समावेश असून, प्रत्येक संघाने आपली ताकद वाढविण्यासाठी गुणवंत खेळाडूंची निवड केली आहे.

लिलावामध्ये खेळाडूंवर एक लाख रुपयांपासून ते तब्बल २० लाख रुपयांपर्यंत बोली लावण्यात आली. आयुष गाडळकर, यदुवर कोकरे आणि भार्गव पिंपळे या खेळाडूंवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले. आयुष गाडळकर याच्यासाठी गांधी वॉरियर्स, यदुवर कोकरे याच्यासाठी डायनॅमिक स्ट्रायकर, तर भार्गव पिंपळे याच्यासाठी विद्यादान अल्फा एक्स संघाने सर्वाधिक बोली लावली. या लिलावामुळे स्थानिक फुटबॉलपटूंच्या गुणवत्तेला मिळणारी व्यावसायिक मान्यता आणि त्यांच्या खेळाचे वाढते महत्त्व अधोरेखित झाले आहे.

दरम्यान, स्पर्धेसाठी विजेत्या संघाकरिता तयार करण्यात आलेल्या चषकाचे अनावरण नमिता फिरोदिया यांच्या हस्ते उपस्थित संघमालक आणि त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत करण्यात आले. या वेळी संघमालक म्हणून ऋत्विक वाबळे, जोएब खान, चेतन गांधी, सिद्धार्थ मुनोत, आशिष टोटू, रोहित रामदिन, सचिन सेलोत, अॅड. ललित गुंदेचा, अभिनंदन आणि रुही भन्साळी यांच्यासह त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. अहिल्यानगर फुटबॉल सुपर लीगचे सामने येत्या २१ व २२ नोव्हेंबर रोजी नगर क्लबच्या मैदानावर रंगणार आहेत. दिवस आणि रात्र अशा दोन सत्रांमध्ये ही स्पर्धा खेळविण्यात येणार असून, फुटबॉलप्रेमींना स्थानिक खेळाडूंचा दमदार खेळ अनुभवता येणार आहे. आठ संघांमधील चुरस, खेळाडूंचे कौशल्य आणि विजेतेपदासाठीची धडपड यामुळे यंदाच्या स्पर्धेत चांगलीच रंगत निर्माण होणार आहे.

या स्पर्धेचे कोपॉवर अभिनंदन आणि रुही भन्साळी (अवित्री मोटशन), किट स्पॉन्सर राजेश भंडारी (महावीर ग्रुप) आणि को स्पॉन्सर प्रणिल मुनोत (कॉनप्लेक्स) आहे. तसेच राम एजन्सी, शिवम सायकल, फन्की लॅण्ड, अमित ट्रेडर्स, जलाराम फुड्स व खेलोफाय यांचे सहकार्य लाभले आहे. स्थानिक खेळाडूंना मोठे व्यासपीठ उपलब्ध करून देणारी ही लीग अहिल्यानगरच्या फुटबॉल विश्वाला नवी दिशा देणारी ठरत आहे.

स्थानिक फुटबॉलपटूंना मोठे व्यासपीठ देण्याचा प्रयत्न! : नमिता फिरोदिया

अहिल्यानगरमधील फुटबॉल खेळाडूंमध्ये गुणवत्ता आणि जिद्दीची कमतरता नाही. मात्र, या खेळाडूंना आपले कौशल्य दाखविण्यासाठी योग्य संधी आणि व्यासपीठ मिळणे आवश्यक आहे. हाच विचार केंद्रस्थानी ठेवून नमोह फुटबॉल क्लबच्या माध्यमातून नमिता फिरोदिया यांनी अहिल्यानगर फुटबॉल सुपर लीगची संकल्पना पुढे आणली. दरवर्षी आयोजित होणाऱ्या या स्पर्धेच्या माध्यमातून स्थानिक खेळाडूंना संघमालकांसमोर आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळत आहे. लाखो रुपयांच्या बोलीद्वारे खेळाडूंची निवड होणे, ही त्यांच्या मेहनतीला आणि कौशल्याला मिळणारी पोचपावती आहे. यंदाच्या पाचव्या सिझनमध्ये १०५ खेळाडू आणि आठ संघांचा सहभाग ही या स्पर्धेची वाढती लोकप्रियता दिसत असल्याची भावना नमिता फिरोदिया यांनी व्यक्त केली.

प्रेरणादायी अक्षरधन

धीर धरी रे धीरापोटी





आपलं अडलं. लोकांना विचारलं. लोकांनी त्याचं उत्तर हसून सांगितलं. ते आपल्याला नाही मानवलं. आपण लगेच त्यांना खोटं म्हटलं. त्यांना आपलं यश पाहवत नाही, असं मानलं का? त्यांना समजून का नाही घेतलं? पुढं कदाचित ते आपल्या हिताचंच निघालं, तर आपलंच हसं झालं. लगेच मला शहाणपण आठवलं.

माझ्या अंगी हुशारी मोठी. वर मी एकपाठी. एकदा जे वाचलं ते कायमचं लक्षात राहिलं. मग मला एकदम वरच्या वर्गात का नाही मास्तरांनी बसू दिलं? मला वाईट वाटलं. पहिल्या वर्गातच म्हणे तुझं नाव घालेनं. तुझी प्रगती व्हावी म्हणून हळूहळू अंगी बाणली. तसंच धनाचं. पै पै वाचवली तेव्हा धनसंपत्ती साठली. थोडं थोडं खावं तरच अंगी लागावं. अभ्यास रोज थोडा थोडा करावा. मिळालेला क्षण वाया न घालवावा. नाहीतर परीक्षा उद्यावर, मग अभ्यास आला अंगावर. आता घाबरणं, उत्साह गमावून बसणं. धनाचं तरी काय एकदम गाठोडं हाती लागणं ? पै पै करुन गाठी बांधणं. गरजेच्या वेळी एकदम का मोठी रक्कम लाभणं ? पण न लाभली तर धंदा बुडणं. दारिद्य येणं.

एवढा प्रतापी चण्डमार्तण्ड, पण तो सूर्य तरी काय एकदम पूर्वेकडून पश्चिमेला उडी मारतो ? तो थोडं थोडं आकाश आक्रमितो. म्हणूनच त्याचा प्रभावही टिकतो. रोग घालवायला वैद्य काय एकदम एकाच दिवशी सगळं औषध घटाघट प्यायला सांगतो ? रोगी तरी ते काय तसं पिऊ शकतो? म्हणून कुणाचाही उत्साह वाढेल असं करावं. हळूहळू पुढं जायला सांगावं. ऐकणाऱ्यानंही ते मानावं. तेच त्याच्या हिताचं समजावं.

सूर्य आकाशाचं अंतर हळूहळू कापतो. पूर्वेकडून एकदम पश्चिमेला जात नाही. जगाची वा समाजाची घडी विस्कटून टाकीत नाही. म्हणूनच भेट होईल की नाही सांगता येत नाही, म्हणून तुम्हाला नमस्कार करायला आलो आणि तो बुद्धांच्या सेवेत प्रदीर्घ काळ घालवलेला संन्याशी जायला निघाला.

गौतमबुद्धांनी त्याला थोडं थांबायला सांगितलं व प्रश्न विचारला, तुझं वय काय? तो संन्यांशी म्हणाला, फक्त चार वर्ष. फार नाहीत ना झालेली. बुद्ध म्हणाले, मग ठीक आहे. जा माझे आशीर्वाद आहेत. तू लवकर पोहोचशील.

राजा प्रसेनजित मात्र चकित झाला. पंचाहत्तरीचा माणूस आपले वय चार वर्ष सांगतो? आणि भगवान मानतात ? पण भगवंतांनी याला माझ्यासमक्ष असा भलताच प्रश्न का विचारला ? भगवान त्याच्या मनातलं समजले. हसले व म्हणाले, ज्ञानमार्गाला लागायला त्याला चार वर्ष लागली. ज्ञानमार्गाचा आठवण व्हायला सत्तर वर्ष वाया गेली. वाया गेलेली वर्ष का मोजायची. ज्ञानप्राप्ती का चुटकीसरशी व्हायची ? पण हे वय आताच विचारण्याचं, मला तरी प्रयोजन वाटत नाही. प्रसेनजित म्हणाला. भगवान म्हणाले, कसं नाही? तुझा ज्ञान मिळवण्याचा व मोक्षप्राप्तीचा उतावळेपणा तुला. **– किशोर गांधी**

त्या मित्राचं मार्ग चालणं पूर्ण होताच जनतेकडून सायंकाळी गुलाल उधळीत त्याचं स्वागत होतं. गौतबुद्धांची एक कहाणी आहे. एकदा एका नावाचा प्रसेनजित तरुण राजा बुद्धांच्याकडे आला. मला दीक्षा हवी. म्हणाला, तत्काळ मुक्ती द्यावी म्हणून आर्जव करू लागला. भगवान काही बोलले नाहीत.

तेवढ्यात एक ७५ वर्षाचा संन्याशी आला. गौतमबुद्धांच्या पाया पडला. तुमच्या बोलण्यात व्यत्यय आणल्याबद्दल प्रथम क्षमा करा. मला परगावी जायचं आहे. सायंकाळच्या आत पोहोचायंच आहे. (बौद्धभिक्षु रात्री प्रवास करीत नाहीत.) पुन्हा

‘टिव्हिएस रेडऑन ११०’ नवीन बाईकचे अहिल्यानगरमध्ये अनावरण



नगर – टिव्हिएसने आपली स्टाईलिश लुक असलेली रेडऑन ११० ही बाईक बाजारपेठेत उपलब्ध करून दिली आहे. आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते या गाडीचे अनावरण करण्यात आले. संपुर्ण रेंज मध्ये ८० सीसी पासुन ३५० सीसी पर्यंतची दमदार वाहने आपल्याला पहावयास मिळतात.

टिव्हिएस रेडऑन ११० मध्ये आकर्षक एलईडी टेक हेड लॅम्प, ग्लाईड थ्रु टेक्नॉलॉजी, लांब कुशन सीट, कलरफुल एलसीडी डिस्प्ले (रियल टाईम मायलेजसह), डायनामिक ग्राफिक्स, आकर्षक कलर, नाविण्यपुर्ण ग्राफिक्स या वैशिष्टयामुळे ते ग्राहकांना नक्कीच आवडेल शिवाय या गाडीवर टिव्हिएस देत आहे १० वर्षांची इंजिन वॉरंटी किंवा १ लाख किमी. या गाडीची एक्स शोरूम किंमत ८०,०५० असुन अधिकाधिक ग्राहकांनी आपली आवडती गाडी आजच बुक करा असे आवाहन डिलर्स कडुन करण्यात आले आहे

टिव्हिएस रेडऑन ११० दमदार परफॉर्मन्स आणि लुकच्या बळावर नक्कीच सर्वांच्या पसंतीस उतरेल असा विश्वास अहिल्यानगर जिल्ह्याचे अधिकृत डिस्ट्रीब्युटर्स भनसाळी टिव्हिएस, शिवम टिव्हिएस व महावीरा टिव्हिएस यांनी व्यक्त केला.

टिव्हिएस कंपनी ही भारतातील सर्वात मोठी दुचाकीची रेंज असणारी कंपनी आहे. टिव्हिएसच्या दुचाकी या ॲव्हरेज, लेटेस्ट लुक, आकर्षक कलर, दमदार, टिकाऊपणा आणि पेट्रोल व इलेक्ट्रिक या दोन्ही प्रकारात मिळत असल्याने ग्राहकांचा टिव्हिएस वाहने खरेदीकडे कल वाढला आहे. टिव्हिएस कंपनी नेहमीच ग्राहकांना सर्वोत्तम व चांगली वाहने देण्याचा प्रयत्न करत असते. आकर्षक फायनान्स स्किम, कमी व्याजदर व योग्य किंमत यामुळे सामान्यांना परवडणारे व पसंतीचे वाहन म्हणुन लोकांनी टिव्हिएसच्या दुचाकींना पसंती दिली आहे.

टिव्हिएस कंपनीची आयक्युब मिलेनियर, अपाचे १६० फोरव्ही आणि ज्युपीटर ११० ही वाहने देखील आकर्षक लुक, कलर व अधिक नवीन फिचर्ससह कंपनीने बाजारात उपलब्ध करून दिली आहेत. त्यामुळे ग्राहकांना अधिक फिचर्स व नवनवीन कलर मध्ये आपले वाहन खरेदी करता येणार आहे.



कु.रोजिना शेख कु.रोजिना रिझवान शेख या विद्यार्थीनीचा एम.बी.बी.एस. या अभ्यासक्रमास प्रवेश झाला. फातेमा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स कॉलेज, कडप्पा, आंध्रप्रदेश या महाविद्यालयात वैद्यकीय शिक्षण घेणार आहे. त्याबाबत कु.रोजिना सह तिचे वडील डॉ.रिझवान अहमद आणि डॉ.रेश्मा रिझवान यांचा अभिनंदन करून सत्कार करण्यात आला.

‘श्रुती संगीत’ तर्फे नगरमध्ये ८ नोव्हेंबर रोजी ‘संगीत स्वरसम्राज्ञी’ दिवाळी पहाट नाट्य प्रयोग



नगर – श्रुती संगीत निकेतन प्रस्तुत नाट्य दीपोत्सव २०२६ या गेली १२ वर्षे सातत्याने सादर होत असलेल्या उपक्रमाअंतर्गत दिवाळी पहाटची अनोखी मेजवानी 'संगीत स्वरसम्राज्ञी' या गाजलेल्या संगीत नाटकाचा प्रयोग होणार आहे

ज्येष्ठ गायिका अभिनेत्री पद्मश्री जयमालाबाई शिलेदार यांच्या पुण्यस्मरणार्थ आणि ज्येष्ठ गायिका अभिनेत्री कीर्ती शिलेदार यांना समर्पित हा प्रयोग ८ नोव्हेंबर रोजी सकाळी ६.३० वा. माऊली सभागृह, सावेडी, अहिल्यानगर येथे होईल. सर्व रसिकांसाठी प्रवेश विनामूल्य आहे.

ज्येष्ठ नाटककार विद्याधर गोखले लिखित आणि पं. निळकंठ बुवा अभ्यंकर यांच्या संगीताने सजलेले हे नाटक १९७२ पासून रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहे. लेखक विद्याधर गोखले, संगीत पं. नीळकंठ बुवा अभ्यंकर, दिग्दर्शन डॉ. धनश्री खरवंडीकर आणि नृत्य दिग्दर्शन सौ. कल्याणी कामतकर यांनी केले आहे.

पुणे येथील संगीतनाट्य क्षेत्रातील आघाडीचे गायक नट चिन्मय जोगळेकर, आणि अहिल्यानगर येथील संगीत नाट्यक्षेत्रातील यशस्वी स्थानिक कलाकार अनिकेत देऊळगांवकर, मोहित मेहेर, रिद्धी कुलकर्णी, समर्थ कोर्टिकर, शौनक कुलकर्णी, डॉ.ऋषिकेश कुलकर्णी, अनुजा कुलकर्णी आणि स्वतः डॉ.धनश्री खरवंडीकर आदी कलाकार या नाटकात भूमिका साकारणार आहेत. साथसंगत (तबला,ढोलकी), शौनक कुलकर्णी (हार्मोनियम) साथसंगत करणार आहेत. या प्रयोगासाठी नाना मोरे (नेपथ्य), गणेश लिमकर (प्रकाशयोजना), रवी जाधव(ध्वनिव्यवस्था), आबा सैन्दाणे (रंगभूषा), सविता भैरी (केशभूषा), मोहिनी खोल्लम (वेशभूषा, नवरंग ड्रेपरी) हे तंत्रज्ञ म्हणून जबाबदारी सांभाळतील.

याचा आनंद घेण्यासाठी उपस्थित राहून प्रतिसाद द्यावा, असे आवाहन श्रुती संगीत निकेतनतर्फे करण्यात आले आहे. प्रयोग वेळेवर सुरू होईल याची नोंद रसिकांनी घ्यावी. प्रवेश विनामूल्य असल्याने पहिल्या चार रांगा राखीव असून प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य असेल.

नगर येथील ‘मे. चिंतामण रामचंद्र देशमुख सराफ’ तर्फे ज्योतिर्मय दिवाळी’निमित्त सुवर्णमहोत्सवी ऑफर्स जाहीर

सोन्याच्या दागिन्यांच्या घडणावळीवर २५ टक्क्यांपर्यंत सूट; जुन्या सोन्याच्या एक्सचेंजवर प्रति १० ग्रॅम १,००० रुपयांचा अतिरिक्त बोनस



श्रीदेवी देशमुख



वैजयंती देशमुख

नगर – दीपोत्सवाचा आनंद द्विगुणित करण्यासाठी आणि ग्राहकांच्या खरेदीला उत्सवाचे रूप देण्यासाठी शहरातील विश्वासार्ह सुवर्णपेढी 'मे. चिंतामण रामचंद्र देशमुख ॲण्ड सन्स सराफ' यांच्या वतीने 'ज्योतिर्मय दिवाळी' या विशेष उत्सवी योजनेची घोषणा करण्यात आली असल्याचे या सुवर्णपेढीच्या संचालिका वैजयंती दिनेश देशमुख व श्रीदेवी मयुरेश देशमुख यांनी सांगितले.

त्या म्हणाल्या, पिढ्यानपिढ्यांचा विश्वास आणि ११५ वर्षांची देदीप्यमान परंपरा इ.स. १९१० पासून कार्यरत असलेल्या या सुवर्णपेढीला ११५ वर्षांहून अधिक काळाची समृद्ध परंपरा आणि पिढ्यानपिढ्यांची ग्राहकसेवा लाभलेली आहे. शुद्धता, पारदर्शकता आणि सर्वोत्तम कारागिरीच्या बळावर संस्थेने नगर शहर व जिल्ह्यात ग्राहकांचा अढळ विश्वास संपादन केला आहे.

आकर्षक सवलती आणि योजनांची वैशिष्ट्ये ग्राहकांना सणासुदीच्या काळात मनपसंत दागिन्यांची सुलभ खरेदी करता यावी, यासाठी विशेष सवलतींचे नियोजन करण्यात आले आहे. घडणावळीवर भरघोस सूट म्हणजे १८ कॅरेट व २२ कॅरेट सोन्याच्या अत्यंत नक्षीदार व कलाकुसरयुक्त दागिन्यांच्या मजुरीवर/घडणावळीवर ५ टक्क्यांपासून तब्बल २५ टक्क्यांपर्यंत विशेष सवलत दिली जाणार आहे. तसेच ग्राहकांना जुन्या सोन्याच्या एक्सचेंज व्हॅल्यूवर प्रति १० ग्रॅम १,००० रुपयांचा अतिरिक्त फायदा मिळणार आहे. हॉलमार्क प्रमाणित सोन्याच्या दागिन्यांच्या एक्सचेंजवर शून्य टक्के कपात लागू असणार आहे, ज्यामुळे ग्राहकांना त्यांच्या सोन्याचे संपूर्ण मूल्य लाभेल. या सर्व आकर्षक योजना १८ नोव्हेंबर २०२६ पर्यंत मर्यादित कालावधीसाठी लागू राहणार आहेत.

या महोत्सवाच्या निमित्ताने पारंपारिक दागिन्यांसोबतच आधुनिक ट्रेंडनुसार हलक्या वजनाचे आणि फॅशनेबल दागिने, पाटल्या, बांगड्या, हार, झुमके आणि अंगठ्यांचे विपुल कलेक्शन दालनात उपलब्ध करून देण्यात आले आहे. याशिवाय ग्राहकांच्या भविष्यातील सुरक्षित गुंतवणुकीसाठी 'अक्षय सुवर्ण बचत योजना' आणि सर्वात कमी घडणावळ हे संस्थेचे वैशिष्ट्य ठरत आहे.

ग्राहकांनी या दिवाळीत आपल्या आवडीच्या सुवर्णखरेदीसाठी पेढीच्या गंजवबाजार आणि सोनानगर, सावेडी या शाखांना अवश्य भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.



टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात दिनांक : 30 ते 05 नोव्हेंबर 2026

रजनी : द जेलर २ (हिंदी) 09:00 AM 03:45 PM 12:30 PM 06:00 PM 02:45 PM 07:00 PM 09:15 PM 10:15 PM
उडता तीर (हिंदी) 09:00 AM 01:45 PM 11:00 AM 04:30 PM 10:00 PM
प्रहार (हिंदी) 10:00 AM 03:45 PM 09:45 PM
दृश्यम ३ 11:45 PM
आदर्श कुटुंब हाऊस नं.४७ (तेलुगु) 06:45 AM
हनुमान अंजा (हिंदी) 12:45 PM
Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher* - Offer Valid On Window Booking & Phone Booking
CONNPLEX SMART THEATRE
AVAILABLE ON bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar Mo. 6353564618 / 7790094001

दैनंदिन मुव्ही-शो च्या वेळा खालील प्रमाणे दिनांक : 23 ते 29 ऑक्टोबर 2026
टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
SCREEN - 1
दशमी 03:00 PM 150/-
गांव थी गावकी.. 12:00 Noon 150/-
प्रहार (हिंदी) 09:00 PM 150/-
सोहळा 06:00 PM 150/-
SCREEN - 2
रजनी : द जेलर २ (हिंदी) 12:00 Noon 150/- 09:00 150/-
दृश्यम ३ 03:00 150/-
कापूसकोंडा (मराठी) 06:00 PM 150/-
आशा रुक्वेअर
कॅन्टीन सुविधा अत्यल्प दरात उपलब्ध
कोतवाली पोलीस स्टेशन जवळ, माणिक चौक, अ.नगर

कोहिनूर मॉलमध्ये ‘दिवाळी फराळ स्पर्धां’चा निकाल जाहीर



दिवाळी फराळ स्पर्धेच्या विजेत्या समवेत बाबा जाधव मसालेचे उमेश गायकवाड, मुंजोबा स्वीट्सच्या जल्पा पांड्या कोहिनूर मॉलच्या संचालिका श्वेता गांधी.

नगर – दिवाळीच्या सणाचे औचित्य साधून कोहिनूर मॉल येथे महिलांसाठी आयोजित करण्यात आलेली 'भव्य दिवाळी फराळ स्पर्धा' उत्साहात आणि चुरशीच्या वातावरणात पार पडली. या स्पर्धेमध्ये अहिल्यानगर परिसरातील सुमारे ८० महिलांनी सहभाग नोंदवून आपल्या पाककौशल्याचे उत्कृष्ट सादरीकरण केले. स्पर्धा प्रामुख्याने 'गोड' आणि 'तिखट' अशा दोन स्वतंत्र गटांमध्ये घेण्यात आली होती. दोन्ही गटांतील विजेत्यांसाठी अनुक्रमे २५०० रुपये (प्रथम), १५०० रुपये (द्वितीय) आणि १००० रुपये (तृतीय) अशी रोख पारितोषिके ठेवण्यात आली होती. याशिवाय प्रत्येकी दोन स्पर्धकांना उत्तेजनार्थ पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

पारंपरिक चव, खमंगपणा, स्वच्छता आणि सादरीकरण या निकषांवर परीक्षकांनी सखोल परीक्षण करून विजेत्यांची निवड केली. स्पर्धेचा अंतिम निकाल पुढीलप्रमाणे : स्पर्धेचा सविस्तर निकाल : गोड प्रकार : प्रथम क्रमांक: अमिता भागवत (₹२,५००/-), द्वितीय क्रमांक: विजयलक्ष्मी भाटे (₹१,५००/-), तृतीय क्रमांक: स्वाती खडमकर (₹१,१००/-), उत्तेजनार्थ: मृदुला शहा व धनश्री खर्डे

तिखट प्रकार : प्रथम क्रमांक: सुरेखा आकडे (₹२,५००/-), द्वितीय क्रमांक: दमयंती खंडेलवाल (₹१,५००/-), तृतीय क्रमांक: वर्षा गुंदेचा (₹१,१००/-), उत्तेजनार्थ: ज्योती माहुले व स्वाती महामुनी

विजेत्यांना रोख पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले.

बाबा जाधव मसाले यांच्याकडून स्पर्धकांना त्यांचे प्रॉडक्ट गिफ्ट म्हणून देण्यात आले.

बाबा जाधव मसालेचे सेल्स मॅनेजर उमेश गायकवाड यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व महिलांनी पारंपरिक चव जपत अप्रतिम पदार्थ सादर केले, हे पाहून खूप आनंद झाला. महिलांच्या पाककलेला प्रोत्साहन देणाऱ्या अशा दर्जेदार उपक्रमाशी 'बाबा जाधव मसाले' जोडले गेले, याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. दिवाळी म्हणजे गोडवा आणि आनंदाची देवाणघेवाण. स्पर्धेत सहभागी महिलांनी पारंपरिक चव जपत अत्यंत उत्कृष्ट आणि चविष्ट गोड पदार्थ सादर केले अशा भावना स्पर्धेचे परीक्षक आणि प्रायोजक मुंजोबा स्वीटच्या जल्पा पांड्या यांनी व्यक्त केल्या.

कोहिनूर मॉल केवळ खरेदीचे केंद्र न राहता नागरिकांना एकत्र आणणारे एक कुटुंब बनावे हाच आमचा उद्देश आहे, असे सांगत कोहिनूर मॉलच्या संचालिका श्वेता गांधी यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले व प्रायोजकांचे आभार मानले.

15TH AUG HAPPY INDEPENDENCE DAY OFFER
Career Ki Shurwat DISHA ke saath
An ISO 9001:2015 Certified DISHA® COMPUTER INSTITUTE
Get Any Course Just in 2700/-
MS-OFFICE, ADV. EXCEL, TALLY PRIME, ADV. TALLY, BANKING, TAXATION, 2D CAD, 3D CAD, CORELDRAW, PHOTOSHOP, ILLUSTRATOR, IN DESIGN, C PROGRAMMING, C++, CANVA, HTML.
दिल्ली गेट शाखा 9371051769
जुने बस स्टँड शाखा 9371151769
पाईपलाईन शाखा 7447761769

५० किलोपेक्षा अधिक वजनाची हाताळणी सुरू राहिल्यास राज्यातील बाजारपेठा बेमुदत बंद करणार : अविनाश घुले



नगर – हमाल कष्टकऱ्यांच्या आरोग्याचा आणि सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात ५० किलो वजनाच्या नियमाची काटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी, या प्रमुख मागणीसाठी अहिल्यानगर जिल्हा हमाल पंचायतीच्या वतीने बाजार समितीच्या कार्यालयासमोर निदर्शने करून निवेदन देण्यात आले. यावेळी हमाल बांधवांनी एकत्र येत प्रशासनाचे लक्ष वेधले. बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या आणि बाहेर जाणाऱ्या मालाचे वजन ५० किलोपेक्षा अधिक असू नये, तसेच या नियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी बाजार समितीने तातडीने ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी करणारे निवेदन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव अभय भिसे यांना देण्यात आले. महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाने राज्यभर केलेल्या आवाहनानुसार हे आंदोलन करण्यात आले.

यावेळी बोलताना जिल्हा हमाल पंचायत अध्यक्ष अविनाश घुले म्हणाले की, बाजारपेठेतील प्रत्येक व्यवहारामागे हमाल कष्टकऱ्यांचे मोठे योगदान असते. शेतकऱ्यांचा शेतमाल बाजार समितीत आणण्यापासून ते त्याची उतराई, भराई, साठवणूक आणि वाहतुकीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर हमाल कष्टकरी दिवसरात्र मेहनत घेत असतात. मात्र, बाजारपेठेच्या या व्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या हमालांच्या आरोग्याचा विचार केला जात नाही. ५० किलोपेक्षा अधिक वजनाची पोती उचलण्याची वेळ हमालांवर वारंवार येते. रोजगाराची गरज आणि कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी यामुळे हमाल कोणतीही तक्रार न करता १०० ते १२० किलोपर्यंतचे वजनही उचलतात. मात्र, या अतिरिक्त श्रमांची किंमत त्यांना पुढील आयुष्यात मोजावी लागते. सतत जड वजन उचलल्यामुळे पाठीचे, मणक्याचे आणि सांध्यांचे विकार वाढत आहेत. सुरुवातीला किरकोळ वाटणारी पाठदुखी पुढे गंभीर स्वरूप धारण करते. वयाच्या ४० ते ४५ वर्षांनंतर अनेक हमालांना या आजारांचा त्रास जाणवू लागतो. उपचारासाठी मोठा खर्च करावा लागतो, तर काहींना शारीरिक क्षमता कमी झाल्यामुळे कायमस्वरूपी रोजगाराला मुकावे लागते. त्यामुळे हमालांच्या आरोग्याचे संरक्षण करण्यासाठी ५० किलो वजनाची मर्यादा पाळणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

घुले पुढे म्हणाले की, ५० किलो वजनाची मर्यादा ही केवळ हमालांची संघटनात्मक मागणी नसून कामगारांच्या आरोग्य आणि सुरक्षिततेशी संबंधित महत्त्वाचा विषय आहे. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने ५० किलोपेक्षा अधिक वजनाची हाताळणी हमालांकडून करून घेऊ नये, असे निर्देश दिलेले आहेत. या संदर्भात केंद्र सरकारच्या कामगार विभागाने राज्य सरकारांना पत्रव्यवहार केला आहे. तसेच उच्च न्यायालयाचे आदेश, राज्य सरकारच्या कामगार विभागाची पत्रे आणि राज्य पणन संचालकांकडूनही वेळोवेळी सूचना व परिपत्रके जारी करण्यात आली आहेत. महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळानेदेखील या प्रश्नावर सातत्याने शासनाकडे पाठपुरावा केला आहे. असे असतानाही प्रत्यक्ष बाजारपेठांमध्ये या नियमाची प्रभावी अंमलबजावणी होताना दिसत नाही. शासनाचे आदेश आणि परिपत्रके केवळ कागदावर राहून चालणार नाहीत, तर त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. हमाल हा केवळ कामगार नसून तो कुटुंबाचा कर्ता पुरुष किंवा कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा महत्त्वाचा आधार असतो. त्याचे आरोग्य बिघडल्यास त्याचा परिणाम संपूर्ण कुटुंबावर होतो. त्यामुळे या प्रश्नाकडे सामाजिक जबाबदारीच्या भावनेतून पाहिले पाहिजे, असेही त्यांनी नमूद केले.

बाजार समिती प्रशासनाने या प्रश्नावर केवळ निवेदन स्वीकारून थांबू नये, तर त्यासाठी ठोस कृती आराखडा तयार करावा. बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या सर्व गावांचे सरपंच, शेतकरी, व्यापारी, आडते आणि संबंधित घटकांच्या बैठका आयोजित कराव्यात. या बैठकांमध्ये ५० किलो वजनाच्या नियमाचे महत्त्व समजावून सांगावे. शेतमालाची पोती भरताना वजनाची मर्यादा पाळली जावी, यासाठी व्यापारी आणि शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करावी. आवश्यकतेनुसार बाजार समितीच्या वतीने अधिकृत पत्रके काढून त्यांचा प्रसार करावा. बाजार समितीच्या आवारात तसेच संबंधित व्यवहाराच्या ठिकाणी वजन मर्यादेबाबत स्पष्ट सूचना लावाव्यात. नियमांचे उल्लंघन होणार नाही, यासाठी प्रशासनाने नियमित देखरेख ठेवावी. बाजार समितीच्या माध्यमातून शेतकरी, व्यापारी आणि हमाल यांच्यात समन्वय निर्माण केल्यास या प्रश्नावर निश्चितच मार्ग निघू शकतो, असे घुले यांनी सांगितले.

हमालांच्या मागणीकडे दुर्लक्ष केल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा

अविनाश घुले यांनी यावेळी आंदोलनाची पुढील भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, हमाल कष्टकरी आजपर्यंत बाजारपेठेच्या कामकाजात अडथळा येऊ नये म्हणून सर्व परिस्थितीत काम करीत आले आहेत. मात्र, त्यांच्या आरोग्याची किंमत मोजून बाजारपेठेचे कामकाज सुरू राहणे योग्य नाही. ५० किलोपेक्षा अधिक वजनाची हाताळणी (भराई–उतराई) सुरूच राहिल्यास नाइलाजाने अशा वजनाच्या मालाची हाताळणी बंद करण्याचा निर्णय घ्यावा लागेल. यानंतरही बाजारपेठांमध्ये ५० किलोपेक्षा अधिक वजनाच्या पोत्यांची वाहतूक आणि हाताळणी सुरू राहिल्यास महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाच्या निर्णयानुसार राज्यातील सर्व बाजारपेठा बेमुदत बंद ठेवण्याची भूमिका घ्यावी लागेल. याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित प्रशासनाची राहील. हमालांना आंदोलन करण्याची हौस नाही; त्यांना केवळ सन्मानाने आणि सुरक्षितपणे काम करण्याचा अधिकार हवा आहे. त्यांच्या आरोग्याचा प्रश्न निकाली काढण्यासाठी बाजार समिती प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा. हमालांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष न करता त्यांना न्याय द्यावा, असे आवाहनही घुले यांनी केले.

यावेळी अविनाश घुले, उपाध्यक्ष गोविंद सांगळे, मधुकर केकान, सचिव संजय महापुरे, रवींद्र भोसले, सतीश शेळके, अनुरथ कदम, बाबा गीते, आदिनाथ चेके, अशोक टीमकरे, सुनील गीते, उबेद शेख, पांडुरंग चक्रनारायण, मच्छिंद्र दहिफळे, रत्नाबाई आजबे, मच्छिंद्र गिरी, विष्णू ढाकणे, उगलमुगले आदींसह पदाधिकारी, सदस्य आणि हमाल बांधव उपस्थित होते. त्यांनी ५० किलो वजन मर्यादेच्या नियमाची अंमलबजावणी करण्याची मागणी करत प्रशासनाचे लक्ष वेधले.




दिवाळी खरेदीची लगबग आकाश कंदील, लक्ष्मीमूर्ती, किल्ल्यांच्या साहित्याचे स्टॉलही सजले... दिवाळी सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपल्याने सावेडी उपनगरात सणाच्या खरेदीची लगबग सुरू झाली आहे. परिसरातील विविध ठिकाणी आकाशकंदील, लक्ष्मीमूर्ती, पणत्या तसेच दिवाळीसाठी लागणाऱ्या सजावटीच्या साहित्यांचे स्टॉल्स सजले आहेत. विशेष म्हणजे, दिवाळीनिमित्त विद्यार्थी आपापल्या परिसरात आकर्षक किल्ले तयार करतात. त्यासाठी आवश्यक असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्ती, मावळे, घोडे तसेच किल्ल्यांवरील विविध प्रतिकृतींचे स्टॉलही ठिकठिकाणी लागले आहेत. या साहित्याच्या खरेदीसाठी लहानग्यांसह नागरिकांची गर्दी होत असून, स्टॉल्समुळे सावेडी परिसरात दिवाळीचा उत्साह वातावरण निर्माण झाले आहे. (छायाचित्र – श्रीनिवास बुरगुल)

दिवाळी महासेल..
स्टॉक असेपर्यंत...

महिलांसाठी : साडी, कुर्ती, लेगीन्स, वन पीस,ब्लाऊज भारी, टॉप, लोवर — रु.२००/-ला काहीही १ व रु.५०० ला ३

लेडीज : स्मॉल ते X L टू पीस, कॉर्ड सेट, नाईट ड्रेस रु.२५०/-
टू पीस 3 X L ते 6 x L रु.३००/-

* लहान मुला-मुलींचे ड्रेस रु. २०० पासून पुढे
* लहान व मोठ्या मुलींचे भारी कपडे रु.३०० पासून पुढे
* बेडशीट+पिलो कव्हर
100 x 100 चे ८०० चे रु.४००/-
108 x 108 चे रु.१२०० चे रु.५००/-


वेळ : दुपारी १२ रात्री ८ वाजेपर्यंत

प्रत्येक रु.१००० च्या खरेदीवर एक लकी ड्रॉ कुपन..

* ब्रॅण्डेड लेडीज २ पीस थ्री पीस रु.१००० पासून पुढे
* जेन्टसचे ब्रॅण्डेड शर्ट, टी-शर्ट 6XL पर्यंत तसेच फॉर्मल पॅण्ट व जीन्स ४४ साईजपर्यंत व जम्बो बेडशीट उपलब्ध.

अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल **मयुरी लेडिज मॉल**

मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर ९१२८२०११८८



डॉ.अद्वैत गिते
MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन

* चेहऱ्यावरील स्नायू फडकणे यासाठी बोटॉक्स इंजेक्शनची सुविधा
* पाठदुखी/मज्जा रज्जूवरील आजारे
* डोळ्यांच्या नसांवरील सूज/ऑप्टीक न्यरैटिस
* डोकेदुखी, मायग्रेन * फिटचे आजार, अपस्मार
* हातपायाला मुंग्या येणे, नसांवरील सूज
* तोल जाणे * व्हर्टिगो, चक्कर येणे * अर्धांगवायू, पॅरेलीसीस * विसराळूपणा * थरथर सुटणे, पार्किन्सन

या तक्रारींवर सामाजिक जाणिवेतून मोफत सल्ला व शिबीर

यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.

* सर्व आजारांसाठी ॲडमिट सुविधा उपलब्ध.
* सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.

अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे

जाहीर प्रगटनाचे उत्तरास प्रतिउत्तर

तमाम लोकांस व विशेष करून **ॲड. फारुक बी. शेख व ॲड. नुमेर एफ. शेख, पत्ता. मिसाळ गल्ली, तेलीखुंट, अहिल्यानगर. व त्यांचे अशिल हुजेफा फिदाहुसेन सालुजी व तसनिम हुजेफा सालुजी** यांस प्रस्तुत जाहिर नोटीसीच्या उत्तरास प्रति उत्तराद्वारे कळविण्यात येते की, **आमचे अशिल शेख इम्रान अयाज, रा.दक्षिण मुखी, हनुमान मंदिर जवळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर.** यांनी दिलेल्या माहितीवरून व दाखविलेल्या कागदपत्रांवरून कळविण्यात येते की, मिळकत वर्णन : जिल्हा अहमदनगर पोट तुकडी व तालुका नगर पैकी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मौजे शहरनगर येथील सिटी सर्व्हे नं.६४४८ चे एकुण क्षेत्र २३६.६ चौ.मी. (२५४६.०० चौ.फुट) या मिळकतीसंदर्भात दि.२०/१०/२०२६ रोजी दै.नवा मराठा या वर्तमान पत्रामध्ये ॲड. समीर वखारे यांच्या मार्फत जाहिर प्रगटन प्रसिध्दीस दिले होते व त्यास दि.२४/१०/२०२६ रोजी दै.नवा मराठा या वर्तमान पत्रामध्ये **ॲड. फारुक बी. शेख व ॲड. नुमेर एफ. शेख** यांच्या मार्फत जाहिर प्रगटनास उत्तर प्रसिध्दीस दिले आहे. सदर उत्तरामध्ये नमुद कथन संपुर्णपणे खोटे व लबाडीचे असुन बेकायदेशीर आहे व ते आमच्या अशिलास कबुल व मान्य नाही.

सदर मिळकतीबाबतची वस्तुस्थिती व खरी हकीगत अशी आहे की सिटी सर्व्हे नं.६४४८ मध्ये नजमा मोहंमद शेख यांनी शेख यासीन शेख मजीद यांच्याकडुन दि.२०/०२/१९९२ रोजी खरेदीखत दस्त क्र.१०१९/२३२ अन्वये खरेदी घेतलेला हिस्सा ६९.७० चौ.मी. (७५०.०० चौ.फुट) नमुद केलेला आहे परंतु वास्तविक पाहता मुस्लिम व्यक्तीगत कायद्यान्वये शेख यासीन शेख मजीद यांना सदर मिळकतीमध्ये कायदेशीर हिस्सा १०.२२ चौ.मी. (११०.०० चौ.फुट)निष्पादित होत आहे व तसेच सिटी सर्व्हे नं.६४४८ मध्ये लियाकत मोहंमद शेख व समीर मोहंमद शेख यांनी शेख इमाम शेख मजीद यांच्याकडून दि.२३/०३/२००६ रोजी खरेदीखत दस्त क्र.१०९८/२००६ अन्वये खरेदी घेतलेला हिस्सा ६९.७० चौ.मी. (७५०.०० चौ.फुट) क्षेत्र देखील बेकायदेशीर आहे कारण सदर खरेदी देणार शेख इमाम शेख मजीद यांना मुस्लिम व्यक्तीगत कायद्यान्वये सदर मिळकतीमध्ये कायदेशीर हिस्सा १०.२२ चौ.मी. (११०.०० चौ.फुट) निष्पादित होत आहे. त्यामुळे सदर दोन्ही खरेदीखतान्वये एकुण १३९.४ चौ.मी. (१५००.०० चौ.फुट) क्षेत्र हस्तांतरीत झाल्याचे प्रथम दर्शनी झाल्याचे भासत आहे परंतु सदर मिळकत विक्रेता शेख यासीन शेख मजीद व शेख इमाम शेख मजीद यांना मुस्लिम कायद्यान्वये त्यांच्या कायदेशीर मालकीचा असलेला फक्त २०.४४ चौ.मी. (२२०.०० चौ.फुट) क्षेत्रहस्तांतरीत करण्याचा हक्क व अधिकार असल्यामुळे त्यांच्याकडून ११८.९६ चौ.मी. (१२८०.०० चौ.फुट) क्षेत्राचे बेकायदेशीर हस्तांतरण झालेले असल्यामुळे नजमा मोहंमद शेख, लियाकत मोहंमद शेख व समीर मोहंमद शेख यांना खरेदी घेतलेल्या क्षेत्राचे कायदेशीर टायटल प्राप्त झालेले नव्हते व नाही व अशा बेकायदेशीर खरेदीखतान्वये लियाकत मोहंमद शेख व इतर यांनी नगर भुमापन अधिकारी यांना दिशाभुल करून व खोटी माहिती देऊन आपल्या नावाची नोंद सदर बेकायदेशीर खरेदीखतान्वये मिळकतीचे सिटी सर्व्हे उताऱ्यावर करून घेऊन खरेदी घेतलेल्या मिळकतीबाबत सन २०१३ साली पोटहिस्सा मोजणी करून घेतली व सदर पोटहिस्सा मोजणी अन्वये त्यांच्या नावे बेकायदेशीर रित्या आलेले क्षेत्रास सिटी सर्व्हे नं.६४४८/२ चे क्षेत्र १६०.४० चौ.मी. (१७२६.०० चौ.फुट) असे क्षेत्र असलेला खोटा सिटी सर्व्हेचा उतारा तयार करून घेऊन त्यावर अनाधिकृतपणे मालकी नसलेल्या क्षेत्रावर अहमदनगर महापालिकेची दिशाभूल करून स्वतंत्र उतारा केल्याचा गैरफायदा घेऊन बांधकाम परवानगी घेतली व त्यावर मोनलिस हाईटस नावाची इमारत बांधली. आमचे अशिल सदर सिटी सर्व्हे नं.६४४८ मध्ये असलेले मुळ मालकांचे वंशावळीमधील कायदेशीर वारसदार व हक्कदार आहे व त्यामुळे आमचे अशिलानी सदर इमारतीमधील इतर सहधारकांबरोबर मिळुन सन २०१४ साली लियाकत मोहंमद शेख व इतरांविरुध्द अहमदनगर येथील दिवाणी न्यायालयात रे.मु.नं.४१५/२०१४ चा दावा दाखल केला होता व सदर दावा दाखल झाल्यामुळे तसेच सत्य परिस्थिती समजल्यानंतर लियाकत मोहंमद शेख व इतर यांनी सदर मोनलिस हाईटस या इमारतीमधील ग्राऊंड फ्लोअरवरील दुकान नं.१ ते ६ हे सर्व दुकाने हुजेफा फिदाहुसेन सालुजी व तसनिम हुजेफा सालुजी यांना विक्री केले व सदर इमारतीमधील सर्व फ्लॅट देखील दिशाभूल करून व खोटी माहिती देऊन विक्री केलेली आहे. त्यामुळे सदर इमारत व त्यामधील युनिट धारकांना कायदेशीर टायटल व योग्य मालकी प्राप्त झालेली नाही व अशा परिस्थितीत देखील सदर दुकान नं.१ ते ६ चे खरेदीदार **हुजेफा फिदाहुसेन सालुजी व तसनिम हुजेफा सालुजी व फर्स्ट फ्लोअरवरील फ्लॅटचे खरेदीदार इम्रान हसन पठाण व दुसऱ्या फ्लोअरवरील फ्लॅटचे खरेदीदार यासर इम्तियाज शेख व आयशा यासर शेख हे** त्रयस्त इसमांबरोबर मिळकत विक्रीचे व्यवहार करण्याचे प्रयत्न करीत आहे व कोणाचीही फसवणुक होऊ नये या उद्देशाने आमच्या अशिलाने दि.२०/१०/२०२६ रोजी सदर सिटी सर्व्हे नं.६४४८/२ मधील मोनलिस हाईटस या इमारतीबाबत खरी व सत्य परिस्थिती नमुद करून जाहिर प्रगटन प्रसिध्द केलेले होते व आहे. त्यामुळे सदर जाहिर प्रगटनास **हुजेफा फिदाहुसेन सालुजी व तसनिम हुजेफा सालुजी यांच्या मार्फत ॲड. फारुक बी. शेख व ॲड. नुमेर एफ. शेख, पत्ता. मिसाळ गल्ली, तेलीखुंट, अहिल्यानगर. यांनी दि.२६/१०/२०२६ रोजी** दै. नवा मराठा या वर्तमान पत्रामध्ये दिलेले उत्तर पुर्णपणे **खोटे व बेकायदेशीर आहे याची तमाम लोकांनी व विशेष करून ॲड. फारुक बी. शेख व ॲड. नुमेर एफ. शेख, व त्यांचे अशिल हुजेफा फिदाहुसेन सालुजी व तसनिम हुजेफा सालुजी व इम्रान हसन पठाण व यासर इम्तियाज शेख व आयशा यासर शेख हे यांनी नोंद घ्यावी.**

त्यामुळे कुणाचीही आर्थिक फसगत होऊ नये व विनाकारण वाद उपस्थित होऊन नये या प्रामाणिक हेतुने आमचे अशिला मार्फत प्रस्तुत जाहिर प्रगटनाचे उत्तरास प्रति उत्तराद्वारे तमाम लोकास कळवितात की सदर सिटी सर्व्हे नं.६४४८/२ मधील मोनलिस हाईटस या इमारतीमध्ये **दुकान नं.१ ते ६ बाबत हुजेफा फिदाहुसेन सालुजी व तसनीम हुजेफा सालुजी व फर्स्ट फ्लोअरवरील फ्लॅट नं.१ बाबत इम्रान हसन पठाण व यासर इम्तियाज शेख व आयशा यासर शेख** यांचे बरोबर कोणीही मिळकत खरेदी विक्रीचे व्यवहार करू नये अथवा मिळकतीबाबत कुठल्याप्रकारे आर्थिक व्यवहार, करार इत्यादी करू नये अगर केल्यास तो आमचे अशिलावर मुळीच बंधनकारक राहणार नाही व संबंधीतांना मिळकतीमध्ये कुठलेही कायदेशीर मालकीहक्क व अधिकार व टायटल मुळीच प्राप्त होणार नाही व अगर मिळकती खरेदी केल्यास मिळकत खरेदी घेणार व विक्री करणार यांच्या विरुध्द आमच्या अशिलास कायदेशीर सल्ला मिळेल त्याप्रमाणे आमच्या अशिल योग्य ती दिवाणी व फौजदारी कारवाई करतील याची नोंद घ्यावी व सदर सत्य परिस्थितीस अनुसरून आमच्या अशिल त्यांचे सदर सिटी सर्व्हे नं.६४४८/२ मधील असलेले कायदेशीर हक्क व अधिकार प्रस्तापित करण्याकामी दिवाणी न्यायालयात योग्य तो सल्ला मिळेल त्याप्रमाणे कायदेशीर दावा करण्याच्या तयारीत आहे याची देखील नोंद घेण्यात यावी. कोणाचीही फसवणुक होऊ नये या प्रामाणिक हेतुने प्रस्तुतचे जाहिर प्रगटन प्रसिध्दीस दिले असे.

ता. ०३/११/२०२६,

ॲड. समीर वखारे
पत्ता :- ऑफिस नं.५, पहिला मजला, साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहिल्यानगर. मो. नं. ९०१६७८९९९. ९८६०८०५५५९

उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र.०७ अहिल्यानगर यांचे कार्यालय

भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ११ खालील प्राथमिक अधिसूचना

अधिसूचना

क्रमांकः भूसं/मौजे देशमुखवाडी, ता.कर्जत/ एस.आर, क्रमांक – ०१/२०२५

ज्याअर्थी, भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड(इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र.संकिर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/अ–२, दि.१९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश ''उक्त अधिसूचना'' असा करण्यात आला आहे) याव्दारे असे अधिसुचीत केले आहे की, उक्त अधिनियमांच्या कलम ३ च्या खंड (झेड ओ) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्हयातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल :

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, अहिल्यानगर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश ''उक्त जमीन'' असा करण्यात आला' आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यापुढे ज्याचा निर्देश उक्त'' सार्वजनिक प्रयोजन'' असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतुदींन्वये याव्दारे असे अधिसुचीत करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत.

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची चार मध्ये दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोटकलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची पाच मध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसुचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमीनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही. किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमुद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल. परंतू आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्कर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश ''उक्त नियम'' असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उपनियम (३) व्दारे विहित केल्याप्रमाणे भूमिअभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे. आणि ज्याअर्थी उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्य पार पाडण्यासाठी क्रमांक/भूस/कार्या/(१६–अ/ई–(१७६२१७१/२०२५ दि.२२/०४/२०२५ रोजीचे आदेशानुसार उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र.०७ , अहिल्यानगर यांना पदनिर्देशित केले आहे.

अनुसूची – एक
जमीनीचे वर्णन
गाव मौजे देशमुखवाडी, ता. कर्जत, जिल्हा अहिल्यानगर

अनुक्रमांक	गट नबर	आवश्यक जमिनीचे अंदाजित क्षेत्र (हे. आर)
१	२	३
१	५७४	०.३९
	एकुण	०.३९

अनुसूची– दोन
सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नांव :– कुकडी डावा कालवा, चिलवडी कालव्यावरील सोनाळवाडी वितरीका व त्यावरील लघुवितरीका व त्यावरील उपलघु वितरीकाचे बांधकाम

प्रकल्प कार्याचे नाव :– कुकडी डावा कालवा, चिलवडी कालव्यावरील सोनाळवाडी वितरीका व त्यावरील लघुवितरीका व त्यावरील उपलघुवितरीकासाठी मौजे देशमुखवाडी ता, कर्जत जि. अहिल्यानगर येथील क्षेत्र ०.३९ हे.आर जमीन भूसंपादन करणेबाबत. (एस आर–४७/१३३/२००६)

समाजाला मिळणारे लाभ– कुकडी डावा कालवा चिलवडी कालव्यावरील सोनाळवाडी वितरिका व त्यावरील उपलघुवितरिकासाठी मौजे देशमुखवाडी ता. कर्जत जि. अहिल्यानगर येथील क्षेत्र ०.३९ हे. आर जमीन संपादनातून स्थानिक नागरीकांना स्थानिक जमिनीचे/शेतीचे सिंचनाकरीता पायाभुत सुविधा उपलब्ध फरुन देणे, असा सार्वजनिक हिताचा उद्देश आहे.

अनुसूची– तीन

बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे — लागु नाही

अनुसूची– चार

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश

प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक – नाशिक विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, दिनांक २४/०९/२०२६ नुसार भुसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाईचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ प्रकरण दोनच्या व प्रकरण तीनच्या तरतुदी लागू करण्यापासुन सुट देणेत आलेली आहे.

अनुसूची – पाच

नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिलः–
अ. प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम :–लागु नाही
ब. प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता :– लागु नाही.
क. ज्या अधिसूचनेव्दारे प्रशासकाची नियुक्त करण्यात आली आहे त्या अधिसुचनेचा तपशिल :– लागु नाही

टिपः उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी भुसंपादन क्र. ०७ जिल्हाधिकारी कार्यालय अहिल्यानगर यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांक : /१०/२०२६
ठिकाण : अहिल्यानगर

(भारती सागरे)
उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. ०७ अहिल्यानगर

जिमाका /नगर /जाहि /१७२/२०२६

ई–निविदा सुचना क्रमांक १९/२०२६–२७
संक्षिप्त निविदा सुचना

कार्यकारी अभियंता. सा. बां. विद्युत विभाग, नाशिक दुरध्वनी क्र.०२५३–२५७८०१२ E-mail-elnashik.ee@mahapwd.gov.in हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाकडुन शासन निर्णयानुसार आवश्यक त्या वर्गातील नोंदणीकृत व तत्सम कामाचा अनुभव असलेले कंत्राटदार यांचेकडुन ''ब–१'' नमुन्यातील निविदा ई–निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावरुन डाऊनलोड करणेत यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा किंवा कोणत्याहि स्तरावर रद्द करण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा. बां. विद्युत विभाग, नाशिक यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

कामाचे नांव : अहिल्यानगर जिल्ह्यातील एकुण १ काम.
ई–निविदा उपलब्ध कालावधी : दिनांक ०३.११.२०२६ ते १०.११.२०२६
ई–निविदा उघडणे : दिनांक १२.११.२०२६
https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर ई–निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे. निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास संकेतस्थळावरती कळविण्यात येईल.

कार्यकारी अभियंता
सा. बां. विद्युत विभाग, नाशिक

विमाका/नाशिक/जाहिरात/२५५/२०२६

जाहीर नोटीस

तमाम जनतेस, बँका, पतसंस्था, वित्तीय संस्था, सावकार व इतर सर्वांना या सदर नोटीसीने कळविण्यात येते की **अतुल सुरजमल चोपडा, आशा अतुल चोपडा, सुशिला संतोष ढोकले, अमोल महादेव गलांडे, जयश्री अभिजीत तोरडमल** यांचे मालकी व प्रत्यक्ष वहीवाटीचे खालील नमुद प्लॉट्स मिळकती आमचे आशिल **अजय बाबासाहेब थोरात** यांनी खरेदी करण्याचे कबुल व मान्य केलेले होते.सदर प्रस्तावित खरेदी विक्री व्यवहारापोटी आमच्या आशिलांनी वर नमुद विद्यमान मालकास विसार रक्कम दिलेली होती. सदर प्रस्तावित खरेदी विक्री व्यवहाराच्या अनुषंगाने आमच्या आशिलांच्या वतीने यापुर्वी दिनांक १७/१०/२०२६ रोजी दैनिक नवा मराठा या वृत्तपत्रामध्ये जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात आली होती.सदर नोटीसद्वारे संबंधित मिळकतीच्या मालकी हक्कांबाबत तसेच कोणत्याही तृतीय पक्षाचे हक्क, हितसंबंध, बोजे, दावे, हरकती अथवा अन्य अधिकार असल्यास ते जाहीर करण्याचे आवाहन करण्यात आले होते.

मात्र त्यानंतर काही अपरिहार्य कारणास्तव व आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यामध्ये खालील नमुद मिळकतीच्या प्रस्तावित खरेदी विक्री व्यवहार पुढे चालु ठेवणे शक्य नसल्याने, आमचे अशिल व विद्यमान मालक यांनी एकविचाराने व एकमेकांचे संमतीने सदर खरेदी विक्रीचा व्यवहार रद्द करण्याचे निश्चित केलेले असून त्यानुसार सदर व्यवहार रद्द करण्यात आलेला आहे.त्यामुळे यापुर्वी करण्यात आलेली खरेदीची बोलणी व व्यवहाराची सहमती व त्याअनुषंगाने दिलेली आगाऊ रक्कम याबाबत आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यामध्ये ठरल्याप्रमाणे आवश्यक आर्थिक हिशोब व परतफेडीची कार्यवाही करण्यात आलेली आहे.त्यामुळे यापुर्वी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहीर नोटीस मधील प्लॉट्स मिळकती खरेदी करण्याचा आमच्या आशिलांचा प्रस्ताव पुर्णत: रद्द झालेला असून आमच्या आशिलाना सदर मिळकती खरेदी करण्याबाबत कोणताही हक्क, दावा ,हितसंबंध ,अधिकार अथवा स्वारस्य आता शिल्लक राहिलेले नाही.सदर मिळकतीच्या खरेदीसाठी आमच्या अशिलानी यापुर्वी दिलेली संमती व प्रसिध्द केलेली खरेदीची जाहीर नोटीस ही केवळ त्या वेळेच्या प्रस्तावित व्यवहारापुर्ती मर्यादीत होती.सदर व्यवहार रद्द झाल्यामुळे या पुर्वीच्या जाहीर नोटीसचा यापुढे कोणत्याही प्रकारे आधार घेण्यात येवु नये.अथवा सदर मिळकतीवर आमच्या अशिलांचा खरेदीसंबंधी कोणताही हक्क किंवा दावा असल्याचा गैरसमज करून घेवु नये सदर मिळकतीचे विद्यमान मालकी हे त्यांच्या कायदेशीर मालकी हाक्कानुसार सदर मिळकतीबाबत पुढील व्यवहार करण्यास स्वतंत्र असून आमचे अशिल त्याकामी कोणताही अडथळा अगर प्रतिबंध करणार नाही असे जाहीररित्या प्रसिध्द करीत आहेत.

मिळकतीचे वर्णन : –

डि।। अहिल्यानगर सब डि।। ता. नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील **मौजे बोल्हेगाव** येथील **सर्व्हे नं. ७५/३/४अ/४ब मधील प्लॉट्स मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–**

प्लॉट नं.	क्षेत्रफळ (चौ.मी.)	विद्यमान मालक	चतु:सिमा			
			पुर्व	दक्षिण	पश्चिम	उत्तर
१३५	१२८.००	अतुल सुरजमल चोपडा व आशा अतुल चोपडा	प्लॉट नं. १२६	प्लॉट नं. १३४	१२ मी. रस्ता	प्लॉट नं. १३६
१३६	१२८.००	सुशिला संतोश ढोकले	प्लॉट नं. १२५	प्लॉट नं. १३५	१२ मी. रस्ता	प्लॉट नं. १३७
१३७	१२८.००	अमोल महादेव गलांडे	प्लॉट नं. १२४	प्लॉट नं. १३६	१२ मी. रस्ता	प्लॉट नं. १३८
१३८	१२८.००	जयश्री अभिजित तोरडमल	प्लॉट नं. १२३	प्लॉट नं. १३७	१२ मी. रस्ता	प्लॉट नं. १३९
एकुण	५१२.०० चौ.मी					

अहिल्यानगर , दि. ०३/११/२०२६
आमचे अशिल– अजय बाबासाहेब थोरात

ॲड. सुनिल गोरक्षनाथ हरीश्चंद्रे
ॲड. ओंकार पंडीत मोरे
ऑफिस– गाळा नं. ४, महालक्ष्मी चेंबर्स, पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.नं. ९८६०६४६४६३

कुटुंबनिवृत्तीवेतनधारक व निवृत्तीवेतनधारकांना आवाहन

नगर – अहिल्यानगर महापालिकेतुन निवृत्तीवेतन व कुटुंबनिवृत्तीवेतन घेणाऱ्या निवृत्तीवेतनधारकांनी स्वत: हयातीचे दाखले सोबत स्वत:च्या आधारकार्ड व पॅनकार्डची छायांकीत प्रत मोबाईल नंबर जोडुन माहे २७ नोव्हेंबर २०२६ अखेर अहिल्यानगर महानगरपालिका अर्थ विभाग, छत्रपती संभाजीनगर रोड अहिल्यानगर येथे सादर करावे.

जे निवृत्तीवेतनधारक आपले हयातीचे दाखले सादर करणार नाही अशा निवृत्तीवेतन धारकांचे माहे नोव्हेंबर २०२६ चे सेवानिवृत्तीवेतन बँकेत पाठविले जाणार नाही याची नोंद घ्यावी.सोबत येताना बँकेचे पासबुक घेऊन यावे, असे आवाहन मुख्यलेखाधिकारी यांनी केले आहे.

रोकड व कागदपत्रांची फार्महाऊसमधून चोरी

नगर – नगर तालुक्यातील अरणगाव रोडवरील श्रीकृष्णा नगर येथे एका फार्महाऊसचे कुलूप उघडून आत प्रवेश करत अज्ञात चोरट्याने २५ हजार रुपयांची रोकड आणि महत्त्वाची कागदपत्रे असा ऐवज चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत कृष्णा गणेश चौधरी (वय १९, रा. वैष्णवनगर, केडगाव, मूळ रा. भोसले आखाडा, अहिल्यानगर) याने फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचे श्रीकृष्णनगर, अरुणगाव रोड परिसरात फार्महाऊस आहे. २ नोव्हेंबर रोजी रात्री एक वाजता ते सकाळी नऊ वाजेच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने या फार्महाऊसच्या दरवाजाचे कुलूप उघडून आत प्रवेश केला.

चोरट्याने घरातून २५ हजार रुपये किमतीची रोकड, त्यामध्ये विविध चलनांच्या नोटा आणि महत्त्वाची कागदपत्रे असा एकूण २५ हजार रुपयांचा मुद्देमाल फायद्यासाठी चोरून नेला. या प्रकरणी कृष्णा चौधरी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नगर तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०५ (अ), ३३१ (४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

झटपट रेसिपी

गरमागरम मूग डाळ टिक्की

दोस्तांनो, शिक्षण किंवा नोकरीनिमित्ताने बाहेरगावी रहाताना घरच्या चवीची आठवण येत असते. रोजच्या धावपळीत झटपट होणारे तेच ते पदार्थ खावे लागतात. मात्र एखाद्या दिवशी निवांत वेळ असल्यावर तुमच्यातला शेफ जागा होतो. मग एखादी वेगळी रेसिपी ट्राय करता येते. अर्थात ही रेसिपी पौष्टिकही असायला हवी. म्हणूनच प्रथिनयुक्त डाळीपासून टिक्की बनवता येईल. यासाठी मूग डाळ वापरता येईल. चला तर मग मूग डाळीची टिक्की बनवू या.

सामग्री: एक वाटी मूग डाळ, आल्याचा छोटा तुकडा, दोन हिरव्या मिरच्या, चिरलेली/कोथिंबिर, एक चिरलेला कांदा आणि सिमला मिरची, प्रत्येकी एक चमचा जिरेपूड आणि धनेपूड, एक चमचा कॉर्नफ्लोर, अर्धा चमचा आमचूर, चाट मसाला, ५० ग्रॅम पनीर, मीठ आणि तेल.

कृती: एका भांड्यात पाणी गरम करायला ठेवा. त्यात मूग डाळ घालून उकळून घ्या. डाळीतलं पाणी काढून टाका. आता ही डाळ थंड पाण्याने धुवून बाजूला ठेवा. डाळ थंड झाल्यावर मिक्सरच्या भांड्यात डाळ, आलं, हिरवी मिरची आणि कोथिंबिर घालून वाटून घ्या. हे वाटण एका भांड्यात काढा. आता यात चिरलेला कांदा, सिमला मिरची, जिरेपूड, कॉर्नफ्लोर, आमचूर, चाट मसाला, कुस्करलेलं पनीर आणि मीठ घाला. सर्व घटक नीट



मिसळून घ्या. हाताला थोडं तेल लावा. मूग डाळीचं मिश्रण घ्या. त्याला टिक्कीप्रमाणे गोल आकार द्या. अशाप्रकारे सर्व टिक्की बनवून घ्या. गॅसवर तवा ठेवा. त्यावर तेल घाला. गरम झाल्यावर तव्यावर टिक्की ठेवा. दोन्ही बाजूंनी खरपूस भाजून घ्या. ही टिक्की सॉस किंवा चटणीसोबत खाता येईल.

अचिव्हर

डिलिव्हरी बॉय ते रेस्टॉरंटचा मालक!

माणसाचे धैर्य मोठे असेल आणि मेहनत करण्याची जिद्द प्रामाणिक असेल, तर कोणतीही अडचण त्याला ध्येयापर्यंत पोहोचण्यापासून रोखू शकत नाही. 'सोशल मीडिया'वर सध्या बंगळुरूमधील एका तरुण व्यावसायिकाची कहाणी मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. कधीकाळी रस्त्यांवर फिरून लोकांच्या घरापर्यंत जेवण पोहोचवणारा हा तरुण आज त्याच शहरात स्वतःचे प्रसिद्ध सीफूड रेस्टॉरंट चालवत आहे.

ही कहाणी आहे कौशिक खारवी यांची. सुमारे नऊ वर्षांपूर्वी कौशिक आपल्या आयुष्यातील अत्यंत कठीण काळातून जात होते. परिस्थितीशी सामना करत उदरनिर्वाह करण्यासाठी त्यांनी 'स्विगी'मध्ये 'पार्टटाइम डिलिव्हरी पार्टनर' म्हणून काम करण्यास सुरुवात केली. 'गुगल फोटोज्'ने त्यांना नऊ वर्षांपूर्वीची छायाचित्रे आणि स्विगीचे ओळखपत्र पुन्हा दाखवले. त्यानंतर कौशिक यांनी आपल्या संघर्षाची ही कहाणी इन्स्टाग्रामवर शेअर केली. त्या काळात आपण मित्रांपासून लपून डिलिव्हरीचे काम करत होतो, असे त्यांनी सांगितले. लोक आपल्याला केवळ 'डिलिव्हरी बॉय' म्हणून पाहतील आणि त्यावरून आपल्याबद्दल मत बनवतील, अशी भीती त्यांना वाटत होती.

कौशिक त्या दिवसांच्या आठवणी सांगताना म्हणतात, की बेंगळुरूमधील मोठ्या आणि प्रसिद्ध सीफूड रेस्टॉरंटच्या पिकअप काउंटरवर ते तासन्तास उभे राहून जेवणाची ऑर्डर मिळण्याची वाट पाहत असत; मात्र काळ बदलला आणि आज परिस्थिती पूर्णपणे वेगळी आहे. ज्या रेस्टॉरंटच्या काउंटरसमोर ते कधीकाळी ऑर्डर घेण्यासाठी उभे राहत असत, त्याच काउंटरच्या दुसऱ्या बाजूला आज ते स्वतः उभे आहेत. कठोर मेहनत आणि आपल्या कामावरील जिद्दीच्या जोरावर त्यांनी बंगळुरूमध्ये 'मंगलोर इन बंगळुरू' नावाचे स्वतःचे सीफूड रेस्टॉरंट सुरू केले. आज हे रेस्टॉरंट लोकप्रिय 'सीफूड जॉइंट' म्हणून ओळखले जाते.



'स्विगी' आणि टीमचे मानले आभार

आपल्या या प्रवासाची कहाणी शेअर करताना कौशिक यांनी सांगितले, की ग्राहक, भागीदार आणि संपूर्ण टीमच्या पाठिंब्याशिवाय हे यश शक्य झाले नसते. कठीण काळात कामाची संधी आणि आधार दिल्याबद्दल त्यांनी 'स्विगी'चेही मनापासून आभार मानले. 'आज आपण ज्या ठिकाणी पोहोचलो आहोत, ते केवळ सुरुवात आहे. आयुष्यात अजून खूप मोठा पल्ला गाठायचा आहे,' असे कौशिक यांनी म्हटले आहे.

'सोशल मीडिया'वर कौतुक

कौशिक यांची 'रॅग्स-टू-रिचेस', म्हणजेच शून्यापासून शिखरापर्यंत पोहोचण्याची कहाणी 'सोशल मीडिया'वर वेगाने व्हायरल झाली आहे. नेटकरी त्यांच्या संघर्षाचे आणि यशाचे मोठ्या प्रमाणात कौतुक करत आहेत. एका 'युजर'ने प्रतिक्रिया देताना म्हटले, की कौशिक यांची खरी संपत्ती म्हणजे त्यांचा अनुभव, संघर्ष आणि मिळवलेले यश होय. दुसऱ्या एका यूजरने म्हटले, 'इंटरनेटवर एखाद्या अनोळखी व्यक्तीचे यश पाहून आनंदी होण्याचा हा आणखी एक सुंदर दिवस आहे.'



शेर की जुबानी

जिंदगी गुजर जाए पर दोस्ती कम न हो, याद हमें रखना चाहे पास हम न हो।

तारों में अकेला चांद जगमगाता है,मुश्कीलों में अकेला इन्सान डगमगाता है, कांटो से मत घबराना मेरे दोस्त, क्योंकी काटों में भी गुलाब मुस्कुराता है।

कभी रात में तारे गिनके देख लेना, जितना तुम गिन पाए उतना तुम हमें याद करते हो, और जितने तारे बच जाए उतना हम तुमको याद करते हैं।

ॲप वर्ल्ड

'गुगल फोटोज्'मध्ये नवीन फीचर्स

'गुगल'ने आपल्या 'गुगल फोटोज्'मध्ये अनेक नवीन आणि प्रगत फीचर्सचा समावेश करत मोठे अपडेट केले आहेत. या नव्या अपडेटमुळे फोटो एडिटिंग, प्रायव्हसी आणि फोटो ऑर्गनाइज करणे जास्त सोपे आणि आकर्षक होणार आहे. या अपडेटमध्ये 'रेडॅक्ट पेन', ३५ मि.मी. फिल्मसारखा व्हिंटेज लूक देणारा 'मूड्स' पर्याय, १५ नवीन 'रिमिक्स टेम्पलेट्स' आणि भारतात उपलब्ध होणारे 'एआय' आधारित 'वॉर्डरोब' फीचर समाविष्ट आहे. 'रेडॅक्ट पेन'द्वारे गोपनीय माहिती लपवा. 'गुगल फोटोज्'मधील 'मार्कअप' टूल अपडेट करण्यात आले आहे. यात आता नवीन 'रेडॅक्ट पेन' देण्यात आली आहे. या टूलच्या मदतीने फोटोंमधील किंवा स्क्रीनशॉट्समधील आधार कार्ड क्रमांक, पत्ता, गाडीचा नंबर किंवा बँक डिटेल्स यांसारखी संवेदनशील माहिती ब्लर किंवा पिक्सेलेट करता येईल. वापरकर्त्यांना एडिट करताना पेनची जाडी कमी-जास्त करण्याचे पर्याय आणि नवीन फॉन्ट्सही देण्यात आले आहेत. हे फीचर जगभरातील अँड्रॉइड युजर्ससाठी उपलब्ध होत आहे. अँड्रॉइड युजर्ससाठी जागतिक स्तरावर 'मूड्स' हे 'एआय'सक्षम फीचर रोलआऊट करण्यात आले आहे. याद्वारे फोटोंना २०००च्या दशकातील डिजिटल कॅमेरा किंवा ३५ मिमी फिल्मचा 'रेट्रो लूक' देता येईल. हे नेहमीच्या फिल्टरसारखे नसून, 'एआय'द्वारे फोटोनुसार बदलणारे 'स्पेशल इफेक्ट्स' आहेत. या इफेक्ट्सची तीव्रता कमी-अधिक करण्यासाठी स्लायडर कंट्रोलही देण्यात आले आहेत.

'एआय वॉर्डरोब' आता भारतात

'गुगल'ने आपले 'एआय वॉर्डरोब' फीचर आता भारत, अमेरिका आणि ब्राझिलमधील 'अँड्रॉइड' आणि 'आयओएस युजर्स'साठी उपलब्ध केले आहे. हे फीचर तुमच्या जुन्या फोटोंमधील कपडे ओळखून त्यांचे एक डिजिटल कलेक्शन तयार करते. युजर्स विविध कपड्यांचे मॅचिंग करून नवीन आऊटफिट्सचे कॉम्बिनेशन पाहू शकतात आणि 'व्हर्च्युअल ट्राय-ऑन' करू शकतात. या फीचरमधील कपड्यांचा किंवा युजर्सचा डेटा कोणत्याही 'थर्ड-पार्टी रिटेलर्स' किंवा कपड्यांच्या कंपन्यांसोबत शेअर केला जात नाही, असे स्पष्टीकरण 'गुगल'ने दिले आहे.

१५ नवीन 'रिमिक्स टेम्पलेट्स'

'गुगल फोटोज्'मध्ये १५ नवीन 'एआय रिमिक्स टेम्पलेट्स' जोडण्यात आले आहेत. याद्वारे साध्या फोटोंचे रूपांतर 'रेड-कार्पेट लूक्स', वाढदिवसाची ग्रीटिंग कार्ड्स किंवा फोटो बूथ शॉट्समध्ये करता येईल. हे फीचर १८ वर्षांवरील युजर्ससाठी निवडक देशांमध्ये उपलब्ध आहे.

'जेमिनी स्पार्क'ची मदत

अमेरिकेतील 'गुगल एआय प्रो' आणि 'अल्ट्रा' सबस्क्रायबर्ससाठी 'जेमिनी स्पार्क'ची थेट 'गुगल फोटोज्'शी कनेक्टिव्हिटी देण्यात आली आहे. युजर्स एकाच व्हाइस किंवा टेक्स्ट कमांडद्वारे गॅलरीतील सर्वोत्कृष्ट कौटुंबिक फोटो शोधणे, त्यांचा ब्राईटनेस वाढवणे आणि ते शेअर करण्यासाठी तयार करणे ही कामे सहज करू शकतात.

छंदाला करिअर कसे बनवाल?

प्रत्येक व्यक्तीला कोणता ना कोणता छंद असतो. गायन, वादन, नृत्य, चित्रकला, लेखन, वक्तृत्व, फोटोग्राफी, प्रवास, खेळ, स्वयंपाक अशा असंख्य गोष्टींपैकी एखादी आपली आवड असू शकते. या आवडीचे व्यावसायिक कौशल्यात रूपांतर करता आले, तर त्यातून उत्तम करिअर घडू शकते. छंदाचे करिअर होण्याचा सर्वात मोठा फायदा म्हणजे आपल्याला आवडणारे काम हेच आपले रोजचे बनते. त्यामुळे काम ओझे न वाटता त्यातून आनंद मिळतो. आपण अधिक उत्साहाने, सातत्याने आणि कल्पकतेने काम करतो. साहजिकच कामाची गुणवत्ता वाढते. त्यातून आर्थिक उत्पन्नासोबत प्रसिद्धी, प्रतिष्ठा, समाधान आणि समाज मान्यताही मिळू शकते. क्रिकेटचा छंद उत्तम खेळाडू घडवू शकतो. गायनाची आवड संगीत क्षेत्रातील व्यावसायिक करिअर घडवू शकते.



वेगळ्या वाटा

चित्रकलेची आवड कमर्शियल आर्ट, फॅशन किंवा प्रॉडक्ट डिझाइनकडे घेऊन जाऊ शकते. स्वयंपाकाची आवड असल्यास हॉटेल मॅनेजमेंट, रेस्टॉरंट, क्लाऊड किचन, केटरिंग किंवा फूड चॅनेल असे अनेक पर्याय उपलब्ध होऊ शकतात. सोशल मीडिया आणि डिजिटल माध्यमांमुळे फोटोग्राफी, लेखन, फिटनेस, प्रवास, हस्तकला अशा अनेक छंदांमधूनही उत्पन्न आणि स्वतंत्र ओळख निर्माण करण्याचे नवे मार्ग उपलब्ध झाले आहेत.

मात्र, महत्त्वाची गोष्ट लक्षात घेतली पाहिजे; छंद असणे आणि त्यामध्ये व्यावसायिक गुणवत्ता असणे यात फरक आहे. केवळ एखादी गोष्ट आवडते म्हणून तिचे करिअर करणे योग्य ठरेलच असे नाही. त्या क्षेत्रातील आपले कौशल्य, सातत्य, प्रशिक्षण, स्पर्धा, बाजारपेठ आणि उत्पन्नाच्या संधी यांचाही विचार करावा लागतो. म्हणून छंदाचे थेट पूर्णवेळ करिअर करण्यापूर्वी त्याची छोटी चाचणीही घेता येईल.

उदाहरणार्थ, आपल्या चित्रांची विक्री होते का, आपले गायन इतरांना आवडते का, आपल्या खाद्यपदार्थांची चव लोकांना भावते का, किंवा आपल्या डिजिटल कंटेंटला सातत्याने प्रेक्षक मिळतात का, हे पाहावे. गुणवत्ता, कौशल्य, सातत्य आणि बाजारातील मागणी यांचा योग्य मेळ बसला, तर छंदाचे करिअरमध्ये रूपांतर अधिक वास्तववादी ठरते. छंद अध्याप व्यावसायिक दर्जाचा नसेल, तर तो सोडण्याचीही गरज नाही. आपण दुसरे स्थिर करिअर करून संध्याकाळचा वेळ किंवा शनिवार-रविवार आपल्या छंदासाठी देऊ शकतो. एखादा सॉफ्टवेअर इंजिनिअर उत्तम चित्रे काढू शकतो किंवा डॉक्टर गाणे शिकू शकतो. अशा वेळी छंद पैसा देणार नाही; परंतु तो मनाला आनंद, ऊर्जा आणि विरंगुळा नक्कीच देईल. अनेकदा असा छंद मुख्य करिअरमधील ताण कमी करून व्यक्तीला मानसिकदृष्ट्या ताजेतवानेही ठेवतो.

पारंपरिक अन्य करिअर करताना आपला छंद नियमितपणे जोपासला आणि वृद्धिंगत केल्यास कदाचित तो भविष्यात कालांतराने करिअर होऊ शकेल या दर्जाचा होतो. त्या वेळी आपण छंदाचे रूपांतर व्यवसायात करू शकतो. अनिल कुंबळे इंजिनीअर होऊन क्रिकेटमध्ये मोठे करिअर करू शकले. म्हणून छंद जोपासला पाहिजे. छंद करिअर बनला तर यश देतो; विरंगुळा राहिला तर आनंद देतो!

स्टाइलपेक्षा कपड्यांची निवड महत्त्वाची

फॅशनमध्ये यंदा पुरुषांसाठी स्टाइलपेक्षा योग्य कपड्यांची निवड अधिक महत्त्वाची ठरत आहे. सतत बदलणारे तापमान या पार्श्वभूमीवर शरीराला आरामदायी वाटतील अशा पोशाखांना पसंती दिली जात आहे. त्यामुळे हलके फॅब्रिक, रेग्युलर किंवा रिलॅक्स्ड फिट आणि स्मार्ट-कॅज्युअल लूक वॉर्डरोबचे महत्त्वाचे भाग बनले आहेत.

हलक्या फॅब्रिकला वाढती पसंती पावसाळ्यात अतिशय जाड किंवा वजनदार कपडे परिधान करणे गैरसोयीचे ठरू शकते. त्यामुळे कॉटन, लिनन आणि हलके कॉटन-ब्लेंड फॅब्रिक दैनंदिन वापरासाठी चांगले पर्याय मानले जातात. या फॅब्रिकचे वैशिष्ट्य म्हणजे उष्ण आणि दमट हवामानात ते तुलनेने आरामदायी वाटतात. ऑफिसला जाण्यासाठी किंवा बाहेर पडताना हलका शर्ट आणि ट्राऊजरचे कॉम्बिनेशन याच कारणामुळे व्यावहारिक ठरते.

रिलॅक्स्ड फिट ठरतोय स्टाइल स्टेटमेंट

अतिशय घट्ट कपड्यांऐवजी रिलॅक्स्ड आणि रेग्युलर फिटचा ट्रेंड वाढत आहे. ओव्हरसाइज्ड शर्ट, रिलॅक्स्ड टी-शर्ट आणि स्ट्रेट-फिट ट्राऊजर कॅज्युअल वॉर्डरोबमध्ये समाविष्ट करता येतात. लूक थोडा स्मार्ट ठेवायचा असल्यास बेसिक टी-शर्टवर हलका शर्ट घालता येतो. ऑफिससाठी सॉलिड शर्ट आणि स्ट्रेट किंवा रेग्युलर फिट ट्राऊजर स्वच्छ आणि नीटनेटका लूक देतात.

ट्राऊजर निवडताना काळजी घ्या

अतिशय लांब आणि जमिनीला घासणारे ट्राऊजर त्रासदायक ठरू शकतात. त्यामुळे अँकल-लेंथ किंवा स्ट्रेट-फिट पँट अधिक व्यावहारिक पर्याय ठरू शकतात. चिनोज आणि हलके कॉटन ट्राऊजर पोलो टी-शर्ट, शर्ट किंवा बेसिक टी-शर्टसोबत सहज परिधान करता येतात. जीन्स घालणाऱ्यांसाठी स्ट्रेट किंवा रिलॅक्स्ड फिटअधिक चांगला पर्याय ठरू शकतो.

अर्थी टोनमुळे मिळेल नवा लुक

वॉर्डरोबमधील रंगांचा विचार केला तर ऑलिव्ह ग्रीन, नेव्ही ब्ल्यू, बेज, ब्राऊन, रस्ट आणि मस्टर्ड यांसारखे रंग सहज स्टाइल करता येतात. हे रंग दैनंदिन पोशाखात फार प्रयोगशीलही दिसत नाहीत. यासोबत पांढरा, काळा आणि ग्रे यांसारखे क्लासिक रंगही कायम उपयोगी ठरतात. प्रिंट आवडत असल्यास मोठ्या आणि अतिशय भडक पॅटर्नऐवजी छोटे प्रिंट किंवा मिनिमल डिझाइन निवडता येतील.

फॅशन पॅशन



कमी कपडे, उत्तम स्टाइल

पुरुषांच्या फॅशनचा सर्वात सोपा फॉर्म्युला म्हणजे 'कमी पण योग्य'. जडलेअरिंग आणि गरजेपेक्षा जास्त ॲक्सेसरीजऐवजी आरामदायी फिट, हलके कपडे आणि हवामानाला अनुरूप फुटवेअरवर भर दिला जात आहे. योग्य फॅब्रिक, फिटआणि फुटवेअरच्या मदतीने साधा पोशाखही स्मार्ट आणि आधुनिक दिसू शकतो.

टेक वर्ल्ड



ई-कार ४ मिनिटांत ७० टक्के चार्ज!

इलेक्ट्रिक 'कार चार्जिंग'ला लावली, की आपण आधी गाडीपेक्षा चार्जिंग मीटरकडेच जास्त लक्ष देतो. २० टक्के, ३० टक्के, ४० टक्के आणि तोपर्यंत आपला अर्धा पेशन्स संपलेला असतो; पण आता 'ईव्ही' मालकांची हीच वाट पाहण्याची कटकट कमी होण्याची शक्यता आहे. कारण चिनी कंपनी 'गीली'ने अशी चार्जिंगची टेक्नॉलॉजी आणली आहे, ज्यामुळे ७० टक्क्यांपर्यंत चार्जिंग थेट चार मिनिटांत होणार आहे. 'गीली'च्या नव्या 'स्मार्ट चार्जिंग'चा तंत्रज्ञानाची चाचणी 'लिंक अँड को १०'आणि 'झीकर ००१' या गाड्यांमध्ये करण्यात आली. कंपनीच्या म्हणण्यानुसार, या चाचणीत बॅटरी १० टक्क्यांवरून ७० टक्क्यांपर्यंत अवघ्या ४ मिनिटे ३० सेकंदांमध्ये चार्ज झाली. या टेक्नोलॉजीमध्ये 'एआय'चा वापर करण्यात आला. 'झिंगुई पॉवरमाइंड' नावाचं 'एआय' मॉडेल गाडी, बॅटरी, चार्जिंग स्टेशन,वीज यत्रणा आणि इतर घटकांमधील माहितीचा वापर करून चार्जिंग प्रक्रिया नियंत्रित करतं. त्यामुळे फास्टचार्जिंग व्हायला मदत होणार आहे. एवढ्या वेगाने चार्जिंग करताना बॅटरी गरम होण्याचा धोक असतो. त्यामुळे 'गीली' ने चार्जिंगच्या संपूर्ण प्रक्रियेसाठी पाच टप्प्यांचं 'लिक्विड कुलिंग सिस्टीम'देखील वापरलं आहे. 'चार्जिंग स्टेशन'मधील ऊर्जा साठवणूक यंत्रणा, चार्जिंग युनिट, केबल चार्जिंग पोर्ट आणि कारची बॅटरी अशा संपूर्ण साखळीतील उष्णता नियंत्रित करण्याचा प्रयत्न या सिस्टीममधून केला जाणार आहे. 'फास्ट चार्जिंग'मुळे बॅटरी लाइफवर परिणाम होऊ शकतो का? हा प्रश्न 'ईव्ही' वापरकर्त्यांनी पडला आहे. यासाठी 'गीली' ने 'लिथिमियन पल्स रिस्टोरेशन टेक्नॉलॉजी' दिली आहे. कंपनीच्या मते, 'मायक्रो- पल्स करंट'च्या मदतीने बॅटरीमध्ये होणाऱ्या काही प्रकारच्या झाजेला कमी करण्यात येणार आहे.

'एनटीए'मध्ये आमूलाग्र बदल

'नीट' परीक्षेतील पेपरफुटी आणि गैरप्रकारांचे डाग पुसून काढण्यासाठी 'नॅशनल टेस्टिंग एजन्सी'च्या (एनटीए) संपूर्ण कार्यप्रणालीत आमूलाग्र बदल करण्याची तयारी आता अंतिम टप्प्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या कडक भूमिकेनंतर स्थापन करण्यात आलेली 'हाय-पॉवर्ड टास्क फोर्स' 'एनटीए'ची यंत्रणा हायटेक आणि अचूक बनवण्यासाठी सक्रिय झाली आहे.

या 'टास्क फोर्स'ने 'इस्रो'चे माजी अध्यक्ष के. राधाकृष्णन यांच्याशीही महत्त्वाची चर्चा केली आहे. त्यांनी २०२४ च्या 'नीट' विवादामुळे परीक्षा सुधारणांवर आपला अहवाल सादर केला होता. २०२७ किंवा त्यानंतर 'नीट' परीक्षेला बसण्याची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे नियोजित बदल अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहेत. फिजिकल प्रश्नपत्रिकांची चोरी आणि पेपरफुटी रोखण्यासाठी पेन-पेपर पद्धतीऐवजी ऑनलाइन 'कॉम्प्युटर-बेस्ड टेस्ट' हा सर्वात प्रभावी पर्याय मानला जात आहे.

उच्च शिक्षण


नंदन निलेकणी 'टास्क फोर्स' आणि 'एनटीए नीट-यूजी' परीक्षा लवकरात लवकर 'सीबीटी' पद्धतीने घेण्यासाठी वेगाने काम करत आहे. यासाठी देशभरात सुरक्षित आणि मोठ्या परीक्षा केंद्रांची पायाभूत सुविधा उभारली जात आहे. याव्यतिरिक्त, 'जेईई' मेनच्या धर्तीवर 'नीट' परीक्षा वर्षातून एकापेक्षा जास्त वेळा आयोजित करण्याचा प्रस्ताव सुधारणा समितीसमोर आहे. तसेच, केवळ कोचिंगवर अवलंबून राहण्याच्या पद्धतीला आळा घालण्यासाठी बारावीच्या बोर्डाच्या गुणांना नीटच्या गुणवत्तेत विशिष्ट वेटेज देण्याच्या शिफारशीवरही विचार सुरू आहे.

परीक्षेदरम्यान मानवी निष्काळजीपणा किंवा गैरप्रकार पूर्णपणे रोखण्यासाठी 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' आणि 'डेटा ॲनालिटिक्स'च्या माध्यमातून संशयास्पद हालचाली, असामान्य पॅटर्न किंवा तोतया विद्यार्थ्यांचा शोध घेतला जाईल. परीक्षा केंद्रांवर प्रवेश देण्यापूर्वी 'सीआयएसएफ'च्या कडक सुरक्षेसह 'फेस ऑथेंटिकेशन' आणि पूर्णपणे डिजिटल तपासणी केली जाणार आहे.

वैयक्तिक कर्जाचा तरुणांकडून विचारपूर्वक वापर

भारतातील वैयक्तिक कर्जाचे बाजारपेठेतील स्वरूप वेगाने बदलत आहे. पूर्वी वैयक्तिक कर्जाचा संबंध प्रामुख्याने आपत्कालीन परिस्थिती किंवा आर्थिक अडचणींशी जोडला जात होता; मात्र आता ते विचारपूर्वक वापरले जाणारे आर्थिक साधन बनत आहे. हा बदल विशेषतः तरुण ग्राहक आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम कर्जदारांमध्ये दिसून येत आहे. दीर्घकालीन गुंतवणुकीला हात न लावता नियोजनबद्ध पद्धतीने कर्ज घेण्याबाबत त्यांच्यात अधिक सहजता निर्माण झाली आहे. या बदलामागे दोन बाबी महत्त्वाच्या आहेत. एक म्हणजे कर्जदारांच्या वर्तनात झालेला बदल आणि दुसरी म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्तेवर (एआय) आधारित अंडररायटिंगचा वाढता वापर. ग्राहकांना आता पैसा जलद, अडथळ्याविना आणि अधिक लवचिक पद्धतीने उपलब्ध व्हावा अशी अपेक्षा आहे. तरुण ग्राहक, विशेषतः 'जनरेशन-झेड' आणि पहिल्यांदा कमाई करणारे तरुण, प्रवास, लग्न, जीवनशैलीशी संबंधित खरेदी तसेच आयुष्यातील इतर महत्त्वाच्या प्रसंगांसाठी कर्ज घेण्यास तयार आहेत.

आज अनेक ग्राहक स्वच्छ क्रेडिट रेकॉर्ड ठेवण्याबाबत अधिक जागरूक आहेत. तसेच गरजेपेक्षा जास्त कर्ज घेणे किंवा अनेक कर्जे एकाच वेळी घेण्यासारख्या सवयींपासून दूर राहण्याचाही प्रयत्न केला जात आहे. दुसरीकडे, बँकाही कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि 'मशीन लर्निंग'वर आधारित 'अंडररायटिंग मॉडेल'च्या माध्यमातून कर्जदारांची पत तपासण्याची आणि कर्ज मंजूर करण्याची प्रक्रिया बदलत आहेत. या तंत्रज्ञानामुळे निर्णय अधिक जलद, अचूक आणि सुरक्षित पद्धतीने घेण्यास मदत होते.



अर्थज्ञान

अशा मॉडेलची प्रथम मर्यादित ग्राहकांच्या गटावर चाचणी घेतली जाते. त्यानंतर त्याच्या परिणामांवर लक्ष ठेवून आवश्यक सुधारणा केल्या जातात आणि मगच मोठ्या प्रमाणावर त्याचा वापर केला जातो. यामुळे अंडररायटिंग मॉडेलची अचूकता वाढण्यास, फसवणूक ओळखण्याची क्षमता सुधारण्यास तसेच सायबर धोके आणि ओळखविषयक माहितीच्या गैरवापराशी संबंधित जोखीम कमी करण्यास मदत होते.

'एआय'मुळे कमी वेळेत जोखीम मूल्यांकन

'एआय अंडररायटिंग'मुळे कर्ज देणाऱ्या संस्थांना कमी वेळेत ग्राहकांच्या मोठ्या प्रमाणातील डेटाचे विश्लेषण करता येते. त्यामुळे जोखमीचे अधिक बारकाईने मूल्यांकन करता येते. कर्जाची परतफेड न होण्याची शक्यता अधिक अचूकपणे ओळखता येते आणि त्यानुसार व्याजदर निश्चित करण्याचे निर्णयही अधिक प्रभावी ठरू शकतात. जोखीम अधिक अचूकपणे ओळखल्यामुळे अखेरीस बँक आणि कर्जदार या दोघांनाही फायदा होतो. यामुळे अनुत्पादक कर्जे (एनपीए) कमी करण्यास मदत होऊ शकते.

रोख रक्कम व्यवस्थापनाचे प्रभावी साधन

आणखी एक बदलता कल म्हणजे आर्थिकदृष्ट्या सक्षम ग्राहकांकडून वैयक्तिक क्रेडिट लाइनचा रोख रक्कम व्यवस्थापनासाठी वापर. अल्पकालासाठी पैशांची गरज भासल्यास आपली गुंतवणूक मोडण्याऐवजी अनेक ग्राहक लवचिक कर्ज उत्पादने वापरण्याला प्राधान्य देत आहेत. यामुळे गुंतवणुकीवरील चक्रवाढीचा फायदा कायम ठेवता येतो आणि त्याचवेळी तातडीची रोख रक्कमही उपलब्ध होते. या प्रवृत्तीमधून कर्जाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात झालेला मोठा बदल दिसून येतो. कर्ज हे आता केवळ आर्थिक अडचणीचे लक्षण न मानता, योग्य नियोजन केल्यास आर्थिक व्यवस्थापनाचे एक साधन म्हणूनही पाहिले जात आहे.

पर्यटनासाठी 'ही' ऑफबीट ठिकाणे निवडा

पर्यटनाचा मनमुराद आनंद घेण्यासाठी गर्दी नसलेल्या शांत जागा शोधत आहात? मग उत्तराखंडचे चोपता, कर्नाटकचे अगुंबे आणि हिमाचलच्या जलोरी पाससारख्या सहा 'ऑफबीट डेस्टिनेशन्स'ला नक्की भेट द्या. धुक्याची चादर आणि चोहोबाजूला पसरलेली हिरवळ यामुळे या जागा अधिकच खुलून दिसतात.

शांत, निसर्गरम्य आणि गर्दी नसलेल्या ठिकाणांना भेट द्यायची असेल, तर भारतातील 'ऑफबीट' सहा 'डेस्टिनेशन्स' तुमच्या 'ट्रॅव्हल लिस्ट'मध्ये नक्कीच असायला हवीत.

ताम्हिणी घाट : पुणे आणि रायगड जिल्ह्यांना जोडणारा ताम्हिणी घाट हा महाराष्ट्रातील सर्वोत्तम मॉन्सून ड्राइव्ह स्पॉट्सपैकी एक आहे. पाऊस सुरू होताच या घाटात असंख्य लहान-मोठे पांढरेशुभ्र धबधबे जिवंत होतात. संपूर्ण घाटावर पसरलेली हिरवळ, डोंगरांना स्पर्श करणारे ढग आणि खळाळणारे पाणी यामुळे वीकेंडला जाण्यासाठी ही महाराष्ट्रातील सर्वात लोकप्रिय ऑफबीट जागा ठरते.

पंचमढी : मध्य प्रदेशचे 'सातपुड्याची राणी' म्हणून ओळखले जाणारे पंचमढी हे एक अप्रतिम हिल स्टेशन आहे. पावसाळ्यात येथील धबधबे जसे की, बी फॉल्स आणि अप्सरा विहार पूर्ण वेगाने वाहू लागतात. चोहोबाजूंना दाट धुक्याची चादर आणि हिरवेगार डोंगर पर्यटकांना भुरळ घालतात. शांत आणि प्रदूषणमुक्त वातावरणासाठी ही जागा सर्वोत्तम मानली जाते.

चोपता (उत्तराखंड) : उत्तराखंडमधील 'मिनी स्वित्झर्लंड' म्हणून प्रसिद्ध असलेले चोपता हे ट्रेकर्ससाठी नंदनवन आहे. पावसाळ्यात येथील मखमली गवताळ प्रदेश अत्यंत विलोभनीय दिसतात. हिमालयाच्या कुशीत वसलेल्या या शांत ठिकाणी पावसाच्या थेंबांसोबत पक्ष्यांचा किलबिलाट ऐकण्याचा अनुभव मनाला शांती देतो.



मांडू



पंचमढी

भटकंती

अगुंबे : कर्नाटक दक्षिण भारतातील सर्वाधिक पाऊस पडणारे ठिकाण म्हणून अगुंबे ओळखले जाते. त्याला 'चेरापुंजी ऑफ द साऊथ' असेही म्हणतात. पश्चिम घाटात वसलेले हे ठिकाण औषधी वनस्पती आणि घनदाट जंगलांसाठी प्रसिद्ध आहे. पावसाळ्यात येथील कुद्रेमुख आणि जोगीगुंडी धबधबे पाहणे, तसेच सनसेट पॉईंटवरून धुक्यात हरवलेला सूर्य पाहणे हा एक अद्भुत अनुभव असतो.

मांडू : मध्य प्रदेश तुम्हाला निसर्गासोबतच इतिहासाची आवड असेल, तर मांडू हे उत्तम ठिकाण आहे. पावसाळ्यात या प्राचीन शहराचे सौंदर्य दुप्पट होते. राणी रूपमतीचा महाल आणि जहाज महाल या ऐतिहासिक वास्तूंच्या सभोवताली साचलेले पाणी आणि हिरवळ पाहून असे वाटते की, आपण एखाद्या जुन्या काळातील चित्रपटात आलो आहोत.

जलोरी पास : समुद्रसपाटीपासून सुमारे १०,८०० फूट उंचावर असलेला जलोरी पास हा हिमाचल प्रदेशातील एक छुपा खजिना आहे. पावसाळ्याच्या दिवसांत इथल्या देवदार आणि पाईनच्या झाडांवरून वाहणारे धुके आणि सभोवतालच्या दऱ्यांचे दृश्य डोळ्यांचे पारणे फेडते. साहसी पर्यटकांना आणि शांतता प्रिय लोकांना ही जागा प्रचंड आवडते.

माळीवाडा वेशीतील महात्मा फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे काम तातडीने सुरू करा! परिसरातील बेकायदेशीर अतिक्रमणे हटवा अन्यथा १६ नोव्हेंबरपासून बेमुदत उपोषण

दिवाळीनंतर कारवाई : आयुक्त यशवंत डांगे



माळीवाडा वेशीतील महात्मा फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे काम तातडीने सुरू करण्याच्या मागणीचे निवेदन क्रांतीज्योती सावित्रीबाई महात्मा ज्योतिबा फुले कृती समितीच्या वतीने महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांना देण्यात आले. (छायाचित्र – लहू दळवी)

नगर – माळीवाडा वेशीतील क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या अर्धाकृती पुतळ्याच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर अतिक्रमणे झाली आहेत. क्रांतीज्योती सावित्रीबाई व महात्मा ज्योतिराव फुले यांचे लहान बालकांसह पूर्णाकृती पुतळे उभारण्याचे नियोजन असून, या कामात अतिक्रमणांमुळे अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे परिसरातील सर्व बेकायदेशीर अतिक्रमणे तातडीने हटवून पुतळे उभारणीचे काम सुरू करावे, अशी मागणी क्रांतीज्योती सावित्रीबाई महात्मा ज्योतिबा फुले कृती समितीच्या वतीने महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. तसेच १५ नोव्हेंबर २०२६ पर्यंत अतिक्रमणे न हटविल्यास १६ नोव्हेंबरपासून बेमुदत आमरण उपोषण करण्याचा इशाराही समितीने दिला आहे.

माळीवाडा वेशीमध्ये क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचा अर्धाकृती पुतळा आहे. या पुतळ्याच्या अवतीभोवती मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर अतिक्रमणे झाली आहेत. आमदार संग्राम जगताप यांच्या पुढाकाराने आणि अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने या ठिकाणी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतिराव फुले यांचे लहान बालकांसह पूर्णाकृती पुतळे उभारण्यात येणार आहेत.

या पुतळ्यांच्या उभारणीचे भूमिपूजन महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या हस्ते, तसेच अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते आणि आमदार संग्राम जगतापांच्या उपस्थितीत २७ जुलै २०२५ रोजी झाले होते. मात्र, भूमिपूजन होऊनही अद्याप प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नाही.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, माळीवाडा वेशीच्या परिसरातील बेकायदेशीर अतिक्रमणे हटविल्याशिवाय पूर्णाकृती पुतळे उभारणे आणि परिसराचे सुशोभीकरण करणे शक्य होणार नाही. त्यामुळे महापालिकेने यापूर्वीही करण्यात आलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेऊन अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही तातडीने करावी. पुतळे उभारणीचे काम रखडू नये, यासाठी प्रशासनाने विलंब न करता आवश्यक पावले उचलावीत, अशी मागणी कृती समितीने केली आहे.

महापालिकेने १५ नोव्हेंबर २०२६ पर्यंत सर्व बेकायदेशीर अतिक्रमणे हटवून पुतळे उभारणीच्या कामाला गती द्यावी. निर्धारित मुदतीत कार्यवाही न झाल्यास १६ नोव्हेंबर पासून माळीवाडा वेशी येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई महात्मा ज्योतिबा फुले कृती समिती आणि अहिल्यानगर सकल माळी समाज संस्थेच्या वतीने बेमुदत आमरण उपोषण सुरू करण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

या मागणीचे निवेदन महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, स्थायी समितीचे सभापती पै. सुभाष लोंढे, आयुक्त यशवंत डांगे यांना देण्यात आले. यावेळी त्यांनी शिष्टमंडळाशी चर्चा करत दिवाळीनंतर परिसरातील अतिक्रमणे हटविण्याची कार्यवाही करण्यात येईल आणि क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या उभारणीचे काम सुरू करण्यात येईल, असे आश्वासन दिले. यावेळी अध्यक्ष प्राध्यापक माणिक विधाते, स्थायी समितीचे माजी सभापती किशोर डागवाले, माजी उपमहापौर अनिल बोरुडे, सचिव अशोक कानडे, बाळासाहेब भुजबळ, पंडितराव खरपुडे, ज्ञानेश्वर रासकर, बजरंग भुतारे, अमोल भांबरकर, अनिल इवळे, रोहन डागवाले, ॲड. सुनील सूर्यवंशी आदी सदस्य उपस्थित होते.



गुरुवाणी – १०० अनुशासन अत्यावश्यक

धर्मसंघ, परिवार, संघटन हे जीवनाचे जंगल पार करण्यासाठी असते. छत्रपती शिवाजी महाराज यांना शूरवीर मावळे मिळाले. मग त्यांनी स्वतःला आणि समाजालाही जुलमी मुघलांच्या गुलामीपासून मुक्त केले. जर गाडीला योग्य घोडे, बैल मिळाले नाही तर प्रवास अवघड होतो. बैलगाडीला लावलेले बैल नाठाळ असतील तर गाडी चालवताना अडचणी येतात. संघात, परिवारात अशा प्रवृत्ती असल्या तर चांगली व्यवस्थाही बिघडते. अलंकार बनवण्यासाठी सोन्यात काही ना काही तांबे मिसळावेच लागते. तसेच उत्तम व्यवस्थेतही परिपूर्णता कधीच नसते. जिथे काही चांगले काम न करण्यासाठी सबबी दिल्या जातात, तिथे व्यवस्था निर्माण होत नाही. अनेक धर्मात प्रोटोकॉल तोडले तर शिक्षेची तरतूद आहे. दादा गुरुदेव रत्नऋषीजी महाराज यांनी अनेकांना दीक्षा दिली. पण त्यांच्यासोबत फक्त आचार्य गुरुदेव आनंदऋषीजी महाराजच टिकून राहिले. पूज्य रत्नऋषीजींचे अनुशासन खूप कडक होते म्हणूनच त्यांचे शिष्य असलेले पूज्य आनंदऋषीजी महाराज आचार्य भगवंत बनले. अनुशासन न पाळणारा स्वतःही दुःखी बनतो आणि आपल्या वरिष्ठांनाही दुःखच देतो. मनात एकच भाव जागृत करा, माझ्यामुळे माझे वरिष्ठ, गुरू, आईवडीलांना कधीही दुःखाची अनुभूती यायला नको. पुढचा अध्याय आहे मोक्षगतीचा. जैन धर्म, भगवान महावीर, विज्ञान सांगते की, सृष्टीचा कोणीही निर्माता नाही. अस्तित्व की निर्मिती नहीं हो सकती है, जो अस्तित्व होता है उसकी निर्मिती नहीं होती. जैन दर्शन नाही सांगत की, भगवान नाराज झाले म्हणून भूकंप आला, अतिवृष्टी झाली असं काही नसते. जैन दर्शन यामागील विज्ञान सांगते. ईश्वर म्हणजे शुद्ध आत्मा. जे दुसऱ्याला शुद्ध आत्मा बनवतात ते भगवंत आहेत. सृष्टी चालवणारा कोणी नाही आणि शिक्षा देणाराही कोणी नाही. सर्व जगात एक पाखंड चालले आहे. कोणी तरी भगवान तुम्हाला वरून पाहत आहे. त्याला खूष करा स्वर्गात जागा मिळेल. तीर्थंकर महावीर सांगतात, फक्त आणि फक्त तुमचे कर्मच तुम्ही कसे आहात हे ठरवते. ग्रह ताऱ्यांची शांती करून तुमची पिडा दूर होणार नाही असे जैन धर्म सांगतो. विज्ञान समजून घेतले तरच त्या वस्तूचा तुम्हाला उपयोग करता येईल. म्हणूनच जैनिझम समजून घेतले पाहिजे. निसर्ग समजून घेतला तर तीर्थंकरांचे ९ तत्वे तुमच्या लक्षात येतील. जिनेश्वरीने सांगितले तेच परम सत्य आहे याची अनुभूती येईल. आतमध्ये राग, द्वेष नसेल तरच हे व्यवस्थित समजून येईल.

– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.

नगर-पुणे रोडवर हॉटेल बाहेर उभ्या केलेल्या कारची काच फोडून ७३ हजारांचा ऐवज चोरट्यांनी लांबवला

नगर – नगर-पुणे रोडवरील केडगाव बायपास जवळील हॉटेल स्वीट होमसमोर पार्क केलेल्या कारची काच फोडून अज्ञात चोरट्याने ७३ हजार रुपये किमतीचे सोन्याचे कानातील झुमके, घड्याळ, चष्मा आणि रोकड असा ऐवज लांबवल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात चोरी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत दिलरुबा मोहम्मद डेमी (वय ४२, रा. खराडी, पुणे) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी या कुटुंबियांसह प्रवास करत असताना २ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी नगर-पुणे रोडवरील हॉटेल स्वीट होम येथे नाष्टा करण्यासाठी थांबल्या होत्या. त्यांनी आपली कार हॉटेलसमोर पार्क केली होती. त्या हॉटेल मध्ये नाष्टा करत असताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या कारची काच फोडून गाडीचे नुकसान केले आणि आतील ७३ हजार रुपये किमतीचे सोन्याचे कानातील झुमके, घड्याळ, चष्मा आणि रोख रक्कम असे दागिने व ऐवज चोरून नेला. या प्रकरणी दिलरुबा डेमी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्या विरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२), ३२४ (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास महिला पोलीस हवालदार तारडे करत आहेत.

'विखे पाटील' समोर पोलिसाला मारहाण

नगर – एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या हद्दीत विखे पाटील फाऊंडेशनच्या गेटसमोरून भरधाव वेगात जाणाऱ्या दुचाकीस्वाराला थांबवल्याच्या कारणातून वाहतूक शाखेच्या पोलिसाला मारहाण करत शासकीय कामात अडथळा आणल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस स्टेशनमध्ये भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १३२, ११५(२), ३५१(२), ३५२ सह मोटर वाहन अधिनियम १९८८ चे कलम १८५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेची फिर्याद शहर वाहतूक शाखेचे पो.कॉ. गहिनिनाथ राजाराम दहिफळे यांनी दिली असून, ते अहिल्यानगर येथे नेमणुकीस आहेत. १ नोव्हेंबर रोजी दुपारी साडेचार वाजताच्या सुमारास डॉ. विखे पाटील फाऊंडेशनच्या गेटसमोर ही घटना घडली आहे.आरोपी विवेक विकी फुले, सनातन सुनील मेदगे (रा. शिंगवे, देवळाली कॅम्प, नाशिक), अभी विकी फुले (रा. नाशिक देवळाली) हे तिघेजण एका दुचाकीवरून भरधाव वेगात जात होते.त्या दुचाकीस्वारांना वाहतूक पोलिसांनी थांबवून त्यांच्याकडील कागदपत्रे व लायसन्सबाबत विचारणा केली असता वाद झाला. त्याच वेळी तेथे उभा असलेला चौथा आरोपी सतीश अनारसे हा देखील त्यांच्यासोबत मिळून आला असून त्याचे पूर्ण नाव व पत्ता माहिती नसून तो सध्या फरार आहे.आरोपींनी फिर्यादी पोलीस कर्मचारी व त्यांचे सहकारी यांच्यासोबत हुज्जत घातली व फिर्यादीच्या पाठीवर चापट मारली.

याशिवाय आरोपींनी पोलिसांना शिवीगाळ करून बघून घेऊ अशी धमकी दिली व शासकीय कामात अडथळा निर्माण केला असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे.

कैद्यांकडून पोलिसाला जेलमध्येच मारहाण; जीवे मारण्याची धमकी

नगर – अहिल्यानगर येथील सबजेलमध्ये शासकीय कर्तव्य पार पाडत असलेल्या पोलीस कर्मचाऱ्याला कैद्यांनी शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली आणि शासकीय कामात अडथळा निर्माण केला. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यातगुन्हा दाखल करण्यात आले आहेत.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मयूर गोरख धामोरे (वय ३३, कारागृह पोलीस, रा. माधवबाग, भिंगार, अहिल्यानगर) हे सबजेल, अहिल्यानगर येथे कर्तव्य बजावत होते. २ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास ते आपले शासकीय कर्तव्य पार पाडत असताना, सबजेलमधील काही बंदी कैद्यांनी त्यांना अश्लील शिवीगाळ केली. तसेच त्यांच्या शासकीय कामात अडथळा निर्माण करून त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली.

या प्रकरणात बंदी असलेले नीलेश बाळासाहेब जाधव (बंदी क्र. ५३/२६), विजय राजु पठारे (बंदी क्र. १०२८/२६), गणेश उर्फ टिंग्या म्हसुदेव पोटे (बंदी क्र. २००८/२६), मयूर अनिल आगे (बंदी क्र. ८०/२६) आणि अबुजर लतिफ राजे (बंदी क्र. ८४/२६, सर्व रा. सबजेल, अहिल्यानगर) यांनी हा प्रकार केला असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

या प्रकरणी मयूर गोरख धामोरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १३२, ३५१ (२), ३५२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार वडे करत आहेत.



महापालिका कर्मचारी पतसंस्थेकडून सहा सभासदांना दीड लाखांची वैद्यकीय मदत देण्यात आली. (छायाचित्र – लहू दळवी)

महापालिका कर्मचारी पतसंस्थेकडून सभासदांना दीड लाखांची वैद्यकीय मदत

प्रत्येकी २५ हजार रुपयांचे धनादेश प्रदान

नगर – अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेचा सभासद हा संस्थेचा मुख्य घटक असून, सभासदांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या उद्देशाने पतसंस्थेच्या वैद्यकीय मदत निधीतून आर्थिक सहाय्य केले जाते. अनेकदा आर्थिक परिस्थितीमुळे कर्मचारी आजारपणाकडे दुर्लक्ष करून आजार अंगावर काढतात. त्यामुळे त्यांच्या आजाराचे वेळेवर निदान होऊन योग्य उपचार मिळावेत, या उद्देशाने पतसंस्थेच्या वतीने मदत केली जाते. याच उपक्रमांतर्गत ६ सभासदांना प्रत्येकी २५ हजार रुपयांप्रमाणे एकूण दीड लाख रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली, अशी माहिती पतसंस्थेचे चेअरमन बाबासाहेब मुदगल यांनी दिली.

अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या वतीने सभासदांना वैद्यकीय मदत निधीतून देण्यात येणाऱ्या धनादेशांचे वाटप चेअरमन बाबासाहेब मुदगल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. घनकचरा विभागातील सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर असल्याचे सांगून मुदगल म्हणाले की, या विभागातील कर्मचाऱ्यांकडून वैद्यकीय मदत निधीसाठी मोठ्या प्रमाणात अर्ज प्राप्त होत आहेत. यावरून अनेक सफाई कर्मचारी स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करून नियमितपणे स्वच्छतेचे काम करत असल्याचे दिसून येते. आर्थिक अडचणींमुळे आजारपणाकडे दुर्लक्ष होऊ नये आणि कर्मचाऱ्यांना वेळेत उपचार मिळावेत, यासाठी पतसंस्था मदतीचा हात देत आहे.

घनकचरा विभागातील कर्मचाऱ्यांच्या आरोग्यविषयक समस्यांची गंभीर दखल घेण्याची गरज आहे. महापालिकेच्या माध्यमातून या कर्मचाऱ्यांमध्ये आरोग्याविषयी जनजागृती करणे, नियमित आरोग्य तपासणी आणि आवश्यक वैद्यकीय उपाययोजना राबविणे गरजेचे आहे. कर्मचाऱ्यांनीही आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करू नये, असे आवाहन मुदगल यांनी केले.

व्हा.चेअरमन कैलास चावरे म्हणाले, सभासद विजय सोनसळे, अमोल कांबळे, धीरज चव्हाण, सुभाष वाघमारे, रामदास पाचारणे आणि अनिल मंडलिक यांच्या वैद्यकीय उपचारांसाठी पतसंस्थेच्या वैद्यकीय मदत निधीतून प्रत्येकी २५ हजार रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली आहे. सभासदांच्या अडचणीच्या काळात त्यांना आर्थिक आधार मिळावा आणि उपचारासाठी मदत व्हावी, यासाठी पतसंस्था सातत्याने प्रयत्नशील आहे. सभासदांच्या हिताचे निर्णय घेण्यास पतसंस्था नेहमीच प्राधान्य देते, असे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी कैलास चावरे, तज्ज्ञ संचालक जितेंद्र सारसर, संचालक सतीश ताठे, बाळासाहेब पवार, विकास गीते, बलराज गायकवाड, शेखर देशपांडे, किशोर कानडे, गुलाब गाडे, अजय कांबळे, बाळासाहेब गंगेकर, सोमनाथ सोनवणे, विजय कोतकर, कार्यलक्षी संचालक आनंद तिवारी आदींसह सभासद उपस्थित होते.

महाराष्ट्र जमीन मालकी हक्क नोंदणी अधिनियम कायद्यास वकिलांचा विरोध

जमिनीचे मालकी हक्क ठरविण्याचे अधिकार हे दिवाणी न्यायालयालाच असावेत : ॲड. कृष्णा झावरे



नगर – राज्य शासनाने महाराष्ट्र जमीन मालकी हक्क नोंदणी अधिनियम हा कायदा आणण्याचे ठरवून त्यासाठी समिती गठीत केलेली आहे. हा कायदा चुकीचा असून कायद्याच्या अमलबजावणीमुळे मालमत्ता धारकांवर मोठा अन्याय होणार आहे. तसेच महसूल विभागात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होण्याची शक्यता आहे. त्यामुळे हा. व या कायद्यास अहमदनगर बार असोसिएशनचा विरोध असून हा कायदा राज्य शासनाने आणू नये, असा ठराव विशेष सर्वसाधारण सभेत करून वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. कृष्णा झावरे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. महाराष्ट्र जमीन मालकी हक्क नोंदणी अधिनियम कायद्यास विरोध करणारी अहमदनगर बार असोसिएशन ही पहिली संघटना आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यांमधील वकील संघटनांनी या कायद्यास विरोध करावा, असे आवाहन ॲड. कृष्णा झावरे यांनी केले आहे.

वकील संघटनेच्या विशेष सर्वसाधारण सभेत महाराष्ट्र जमीन मालकी हक्क नोंदणी अधिनियम हा कायदा राज्य शासनाने अणू नये व जमिनीचे मालकी हक्क ठरविण्याचे अधिकार हे दिवाणी न्यायालयालाच प्रस्तापित कायद्यानुसार असावेत असा ठराव सर्वानुमते करण्यात आला होता. या ठरावाची प्रत व निवेदन वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. कृष्णा झावरे यांच्यासह शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना दिले.


यावेळी ॲड. नरेश गुगळे, ॲड. सुरेश लगड, ॲड. विनोद शेटे, ॲड. रोहित कळमकर, ॲड. राजनंदिनी पुंडे, ॲड. महेश शेडाळे, ॲड. सुरेश भोर, ॲड. रणजित गोरे व ॲड. रफिक बेग आदी उपस्थित होते.


ॲड. नरेश गुगळे म्हणाले, महाराष्ट्र जमीन मालकी हक्क नोंदणी अधिनियम या कायद्यानुसार जमिनीची नवा नाव नोंदणी करण्याचे अधिकार दिवाणी न्यायालया ऐवजी महसूल अधिकाऱ्यांना देण्यात येणार आहेत. यामुळे मोठ्याप्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचे उदाहरणे इतर इतर राज्यांची असून यामुळे कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाले आहेत. यापूर्वी महसूल अधिकाऱ्यांनी खूप मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करून निर्णय दिलेले आहेत. निर्णय घेताना राजकीय हस्तक्षेप खूप मोठ्या प्रमाणात झालेले आहेत. महसूल अधिकाऱ्यांना कायद्याचे अज्ञान असल्याने ते चुकीच्या पद्धतीने अन्यायकारक निर्णय देऊ शकतात. महसूल यंत्रणा आधीच भ्रष्टाचाराने बरबटलेली असून यामध्ये राजकीय हस्तक्षेपही मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे अशा परिस्थितीमध्ये जर अशा स्वरूपाचे कायदे जर आणले तर त्यामधून सर्वत्र अराजकता निर्माण होईल. त्यामुळे या कायद्यास वकील संघटनेने ठराव करून जाहीर विरोध केला आहे, असे ॲड. नरेश गुगळे यांनी सांगितले.



विविध मागण्यांसाठी लाडक्या बहिणींचा आझाद मैदानावर एल्गार

अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेच्या आंदोलनात अहिल्यानगर जिल्ह्यातील महिलाही सहभागी





लाडकी बहीण योजनेतील प्रलंबित प्रश्नांसह महिलांच्या विविध मागण्यांकडे राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी अखिल भारतीय जनवादी महिला संघटना, महाराष्ट्र राज्य यांच्या नेतृत्वाखाली मुंबईतील आझाद मैदान येथे महिलांचे आंदोलन सुरू करण्यात आले आहे. यात अहिल्यानगर जिल्ह्यातील महिलाही सहभागी झाल्या आहेत. (छायाचित्र – अमित मण्यार)

नगर – लाडकी बहीण योजनेतील प्रलंबित प्रश्नांसह महिलांच्या विविध मागण्यांकडे राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी अखिल भारतीय जनवादी महिला संघटना, महाराष्ट्र राज्य यांच्या नेतृत्वाखाली मुंबईतील आझाद मैदान येथे महिलांचे आंदोलन सुरू करण्यात आले. हातात विविध मागण्यांचे फलक घेऊन मोठ्या संख्येने महिला या आंदोलनात सहभागी झाल्या होत्या. सरकारने महिलांच्या मागण्या तातडीने मान्य कराव्यात, अशी मागणी करण्यात आली. या आंदोलनामध्ये अहिल्यानगर जिल्हयातील महिलाही सहभागी झाल्या आहेत.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या पॉलिट ब्युरो सदस्या व संघटनेच्या राष्ट्रीय उपाध्यक्षा कॉ. मरीयम ढवळे, वरिष्ठ नेत्या व माजी खासदार वृंदा कारत, राष्ट्रीय अध्यक्ष पी. के. श्रीमती, राज्य अध्यक्षा नसीमा शेख, राज्य सरचिटणीस प्राची हातीवलेकर आदींनी या मोर्चाचे नेतृत्व केले. या आंदोलनात प्रामुख्याने लाडकी बहीण योजनेचे ई-केवायसी पोर्टल तात्काळ सुरू करावे, निवडणुकीच्या काळात दिलेली आश्वासने प्रत्यक्षात पूर्ण करावीत, केवळ आश्वासनांची खैरात न करता सरकारने कृती करावी, अशी मागणी करण्यात आली.

तसेच लाडक्या बहिणींचे अर्ज भरून देणाऱ्या अंगणवाडी सेविकांचे मानधन कुठे गेले, असा सवाल उपस्थित करत त्यांचे थकीत व नियमित मानधन तातडीने अदा करावे, अशी मागणीही करण्यात आली. वाढती महागाई आणि सणासुदीचे दिवस लक्षात घेता आनंदाचा शिधा त्वरित वितरित करावा. शिधापत्रिकेवर गहू, तांदूळ, डाळी, चहा, साखर यांसह जीवनावश्यक वस्तूंचा समावेश असलेला १४ वस्तूंचा शिधा उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी आंदोलक महिलांनी केली.

याशिवाय, महिलांना मिळणारे पंधराशे रुपये हे दान नसून आमचा अधिकार आहे, अशी ठाम भूमिका मांडण्यात आली. लाडकी बहीण योजनेतून ९२ लाख महिलांची नावे वगळण्यात आल्याचा मुद्दा उपस्थित करत, ९२ लाख नावे कापली, हाच तुमचा विकास का? असा सवाल सरकारला करण्यात आला. तसेच अन्नसुरक्षा योजनेचे सार्वत्रिकीकरण करण्याची मागणीही करण्यात आली. आश्वासने नकोत, कृती हवी, पंधराशे रुपये हा आमचा अधिकार आहे, अशा घोषणांनी आझाद मैदान परिसर दुमदुमून गेला. महिलांच्या प्रश्नांकडे सरकारने गांभीर्याने लक्ष देऊन सर्व मागण्या तातडीने मान्य कराव्यात, असा निर्धार आंदोलक महिलांकडून व्यक्त करण्यात आला.

यंदाची सुवर्णखरेदी, भरघोस फायद्याची..

दिवाळी धमाका ऑफर

₹999/- प्रतीग्रॅम मजुरी
(22 कॅरेट सर्व दागिन्यांची)

+

₹111/- चांदी चक्क फ्री
(प्रतीग्रॅम सोने खरेदीवर)



11 सोनेखरेदीवर लकी ड्रॉ कुपनव्दारे एलईडी टिव्ही (43") जिंकण्याची सुसंधी*
(प्रती एक ग्रॅम एक लकी कुपन.)

ऑफर कालावधी - 11 ऑक्टोबर 2026 ते 30 सिप्टेंबर 2026 पर्यंत वैध

चंदुकाका ज्वेल्स

शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

बुधवार चालु

Conditions Apply*

प्लॉट विकणे

रो-बंगलो स्कीमसाठी उपयुक्त रेसिडेन्शयल प्लॉट उपलब्ध

L ब्लॉक पारस कंपनी मागील

9607519536
7745072121

शॉप विकणे

पाईपलाईन रोडटच मोरया मंगल कार्यालयासमोर

४०० स्क्वे. फुट शॉप

कापडदुकानाच्या फर्निचरसहित विकणे आहे.

9028132001
9511809700

भाड्याणे देणे आहे

बालिका अश्रमरोड महालक्ष्मी उद्यान समोर असलेले १२ X १५ फुटाचे २ गाळे किंव्हा दोन्ही मिळुन एकच गाळा ,डॉ. क्लिनीक, बँक,पतसंस्था, ऑफिस, गोडाऊन,कॅफे, हॉटेल इ.साठी भाड्याणे देणे आहे

संपर्क
9975672401

2BHK फ्लॅट भाड्याने देणे आहे.

Harish Enclave, रायते नगर,वारिशनगर रोड, नगरपंढरी,अहिल्यानगर

फॅमिलीसाठी भाड्याने देणे आहे



भाडे ₹13,500/- डिपॉझिट ₹27,000/-

फॅमिलीसाठी सुरक्षित व स्वच्छ परिसर.
पार्किंगची सुविधा (मारुतीसुझुकी)

M-08421515251
Agent No Please

सावेडी येथील नामांकित शोरुमसाठी त्वरित पाहिजेत

सेल्समन/सेल्सगर्ल- १०
१ ते २ वर्षांचा अनुभव

कॅशिअर-०४
(आकर्षक पगार) -अर्जासह समक्ष भेटा -

Franchise by - DB VENTURES One Stop Shop
SONY GIFTS PVT. LTD.
Address : Opp. Gold's Gym, TV Center, Savedi Road, A.Nagar

7887395983

पाहिजेत

अहिल्यानगर येथे होलसेल मेडिकलमध्ये काम करण्यासाठी मुले व मुली, जेन्टस् व लेडिज पाहिजेत अनुभवीस जास्त पगार दिला जाईल

संजीवनी एजन्सी
आशीर्वाद घिवडासनोर,नाशिक चौक,अहिल्यानगर

झायव्हर पाहिजे (दुकानात काम करावे लागेल)

शिक्षण कमीत कमी १० वी
भेटण्याची वेळ संध्या. ५ ते ८

पाहिजेत

जुना बाजार येथील होलसेल मेडिकल मध्ये

मुली ५। मुले ५
9422222217

दुपारी १ ते ३ डिलेव्हरीसाठी
मुले- ३
(पार्ट टाइम)
(स्वतः चि टू व्हीलर आवश्यक)

जागा त्वरित भरणे आहे

अकौंटंट (पुरुष) - B.com आणि टॅली इआरपी चे ज्ञान असणे आवश्यक. किमान २ ते ३ वर्षे अनुभव आवश्यक

कॉम्प्युटर ऑपरेटर (पुरुष) - शिक्षण: १२ वी किंवा पदवीधर आणि MS-CIT (कॉम्प्युटरचे ज्ञान असणे आवश्यक) मराठी, इंग्रजी टायपिंग असणाऱ्यास प्राधान्य

अर्जासह समक्ष भेटा : वेळ दु. २.३० ते ५ वा. पर्यंत

टि. एस. ॲग्री वर्ल्ड ऑरगॅनीक प्रा. लि.
नोंदणीकृत पत्ता- २०९५, नालबंद खुंट करशेटजी रोड, अहिल्यानगर

Mo- 8888899613

पाहिजेत

महाराष्ट्र व गोवा राज्य कार्यक्षेत्र असलेली व १००० कोटी रुपयांची वार्षिक असलेल्या **प्रेरणा मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि.**, राहुरी ता. राहुरी, जि. अहिल्यानगर या संस्थेच्या **पाईपलाईन रोड, अहिल्यानगर या शाखेसाठी** खालील पदावर कर्मचारी/अधिकारी नेमणूक करणे आहे.

अ.क्र	पदाचे नाव	शिक्षण	जागा	अनुभव
१)	शाखाधिकारी	एम.सी.एस./ बी.सी.एस./ एम.बी.ए.	१	संगणकीय ज्ञान असणे आवश्यक, तत्सम पदावरील सहकारी बँकिंग / पतसंस्था क्षेत्रातील किमान २ वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य.
२)	अकौंटंट	एम.सी.एस./ बी.सी.एस./ एम.बी.ए.	२	संगणकीय ज्ञान असणे आवश्यक, तत्सम पदावरील सहकारी बँकिंग / पतसंस्था क्षेत्रातील किमान १ वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य.
३)	शिपाई	१२ वी पास	१	तत्सम्पदावरील सहकारी बँकिंग / पतसंस्था क्षेत्रातील अनुभव असल्यास प्राधान्य.

वरील पदास पात्र असलेल्या उमेदवारांनीच दिनांक ०७/११/२०२६ रोजी खालील पत्त्यावर ठीक सकाळी ११ वाजता मुलाखतीस हजर राहावे.

टीप :- मुलाखतीस येतांना स्वहस्ताक्षरात लेखी अर्ज, शैक्षणिक पात्रता व अनुभवाचा दाखला सोबत येऊन येणे अनिवार्य आहे.

मुलाखतीचे ठिकाण -

प्रेरणा मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि...
शॉप नं ४, महालक्ष्मी वेवर्स बिल्डींग, पाईपलाईन रोड, सावेडी. जि. अहिल्यानगर.
मो. 8956497253 / 9423386074
Email - preranamultistate@gmail.com

फायनान्स क्षेत्रात करिअरची सुवर्णसंधी

कलेक्शनसाठी मुले पाहिजेत
(टिप : स्वत:ची टु-व्हीलर आवश्यक)
9822223451

त्वरित पाहिजेत

सावेडी भागामध्ये सिक्युरिटी गार्ड व हाऊस किंपीग मावशी पाहिजे
9579555582, 9730415003

शुद्धतेची परंपरा, सणांचा खरा आनंद.

खास दिवाळीसाठी नमकिन व मिठाई

धनत्रयोदशी व दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

चावंडा केटरर्स

चावंडा स्पेशल लवंग शेव, मोहन थाळ, काजु गजक, ड्रायफ्रुट कसाटा



प्रोप्रा. मुरली महाराज : 9823030554 । रवि उपाध्ये : 8412902554
चावंडा सदन, अभिनव रेसिडेन्सी, विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर

आत्मीयता जपणारे व सर्वांना प्रेम देणारे नित्य हसतमुख व्यक्तिमत्त्व हरपले..

निष्ठुर नियती



कै. नरेंद्र विश्वनाथ दिकोंडा

कळविण्यास दुःख होते की, परिवाराचे आधारस्तंभ..

नरेंद्र विश्वनाथ दिकोंडा

यांना सोमवार, दि. २६ ऑक्टोबर २०२६ रोजी देवाज्ञा झाली.

त्यांच्या पवित्र स्मृतीस

भावपूर्ण श्रद्धांजली

प्रिय मामा, आम्हाला वाट पाहायला लावून, तू तुझी वाट धरलीस कायमची...
तू गेलास हे मान्य जरी केलं, तरी त्या आठवणींचं काय?
त्या पुरेशा नाहीत... मामा, तू हवाच होतास...!

दशक्रिया विधी : बुधवार, दि. ४ नोव्हें. २०२६ रोजी रोजी स. ८ वा. अमरधाम, नालेगाव, अहिल्यानगर येथे होईल.

-: दुःखांकित :-

श्रीमती लता नरेंद्र दिकोंडा (पत्नी)
प्रणव नरेंद्र दिकोंडा (मुलगा) । समीक्षा प्रणव दिकोंडा (सून) । प्रज्वल नरेंद्र दिकोंडा (मुलगा)
गंगाराम विठ्ठल वंगारी । सुरेश नारायण सानम (भाऊजी)
श्रीनिवास गंगाराम वंगारी । श्रीकांत गंगाराम वंगारी । दीपक सुरेश सानम (भाचे)
अनुराधा संतोष लयचेट्टी । विनया हरिष वझाळ । सुजाता योगेश भुसा । प्रियंका योगेश वझाळ (भाची)

समस्त दिकोंडा, वंगारी व सानम परिवार, अहिल्यानगर

91 YEARS



ये दिवाली LUCK की नहीं HAQ की दिवाली

₹1000/- च्या पुढील प्रत्येक खरेदीवर मिळवा हमखास आकर्षक GIFT*

28 ऑक्टो. ते 10 नोव्हें.

Gift वाली Diwali

T&C Apply*

कोहिनूर® सदा सर्वदा सर्वोत्तम कपडे

पार्किंग | बिस्पोक टेलरिंग सुविधा | फॅशन डिझाइनर उपलब्ध | कॉर्पोरेट गिफ्ट व्हाउचर | कॉर्पोरेट युनिफॉर्म

एम.जी. रोड | कोहिनूर मॉल, सावेडी, अहिल्यानगर 7447 7447 90 | कॉलेज रोड , नाशिक 7378 404 404
official_kohinoor_stores